
शुक्रवार, ९ सप्टेंबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ५३
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

प्रत्येक जिल्ह्यात उद्धव ठाकरेंना धक्का बसेल -बावनकुळे/२
मतदाराच्या 'आधार'साठी पनवेलमध्ये विशेष शिबिर/३
कुस्ती स्पर्धेत गावदेवी आंदोशी आखाडा विजेता/५

### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते कर्तव्यपथचे उद्घाटन



**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ८) संध्याकाळी सेंट्रल विस्टा अव्हेन्यू अर्थात कर्तव्यपथचे उद्घाटन करण्यात आले. या प्रकल्पांतर्गत राष्ट्रपती भवन ते इंडिया गेट या मार्गाचे सुशोभिकरण करण्यात आले आहे. या कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याचेही अनावरण केले. दरम्यान, केंद्र सरकारकडून पुढील चार दिवस सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नव्याने उभारण्यात आलेला कर्तव्य पथ हा हिरवाईने नटलेला आहे. १६.५ किलोमीटरचा हा रस्ता लाल ग्रेनाईटने बनलेला आहे. या मार्गावर सुशोभित कालवे, अत्याधुनिक सार्वजनिक सुविधा, विविध राज्यांची खाद्यसंस्कृती दर्शवणारी १६ दुकाने उभारण्यात आली आहेत.



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

खांदा कॉलनी : ओम साई खांदेश्वर महिला व बाल मित्र मंडळाचा गणपती बाप्पा.

# प्रशासनाचे सुशासन व्हावे

## नव्या नियमावलीचा आढावा | मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

सामान्य नागरिकांना केंद्रबिंदू ठेऊन त्यांना शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ सुलभरित्या मिळावा यासाठी सामान्यांच्या समस्या आणि शासकीय कार्यपद्धती यांची सांगड घालत सुशासन नियमावली करावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. ८) दिले.

कृषी, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, आदिवासी विकास, रोजगार निर्मिती या क्षेत्रांना प्राधान्य देऊन अन्य राज्यांना आदर्श ठरेल, अशी नियमावली तयार करावी. प्रशासनाचे सुशासन होण्यासाठी सुशासन नियमावली उपयुक्त होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सुशासन नियमावली तयार करण्याकरिता नियुक्त समितीची बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. या समितीचे अध्यक्ष निवृत्त तत्कालीन उपलोकायुक्त सुरेश कुमार, माजी मुख्य सचिव तथा समिती सदस्य जयंतकुमार बांठिया, स्वाधीन क्षत्रिय, के. पी. बक्षी, अजितकुमार जैन, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव या वेळी उपस्थित होते.

प्रशासन गतिमान करतानाच माहिती आणि तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावीपणे वापर करण्याची गरज आहे. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी



करावयाच्या उपाययोजना, शेतकऱ्यांसाठी जोडधंदा, शेतीत आधुनिक तंत्रज्ञान यासाठी समितीने उपाययोजना सुचविताना त्या क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत घ्यावी. (पान २ वर...)

### अतिवृष्टीबाधितांना तातडीने मदत पुरवण्याच्या सूचना

पुणे, सातारा, रायगड, नाशिक, अहमदनगर या जिल्ह्यांत झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसामुळे नुकसान झालेल्या नागरिकांना आवश्यक ती मदत तातडीने पुरविण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. मुख्य सचिवांसह पुणे, सातारा जिल्हाधिकाऱ्यांकडून मुख्यमंत्र्यांनी मुसळधार पाऊस झालेल्या भागातील सद्यस्थितीची माहिती घेतली असून या पावसामुळे नुकसान झालेल्या नागरिकांना तातडीने योग्य ती मदत पुरविण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

## पनवेल महापालिकेकडून गणेश विसर्जनाची जय्यत तयारी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेने गणेशोत्सवापूर्वी विसर्जनाचे घाट बांधण्यापासून ते गणेश विसर्जनापर्यंची सर्व तयारी पूर्ण केली आहे. घाटावर गर्दी होऊ नये यासाठी ॲपद्वारे स्लॉट बुकिंगची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

दोन वर्षांनंतर कोरोनामुक्त गणेशोत्सव साजरा करण्यात असल्याने वर्षी नागरिकांचा उत्साह पाहता पालिकेने गणेश विसर्जनाची जय्यत तयारी केली आहे. महापालिका क्षेत्रात जवळपास ६१ ठिकाणी विसर्जन मंडप, जनरेटर, हॅलोजन, स्टेज, बॅरिगेटस्, क्रेन, हायड्रा, निर्माल्य कलश, लाऊड स्पीकर, लाईफ जॅकेट ठेवण्यात आले आहेत.

घनकचरा आणि आरोग्य विभागांतर्गत घाटावर निर्माल्य कलश ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी पालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. गणेश विसर्जनावेळी त्या त्या ठिकाणी पथके तैनात करण्यात येणार असून एका अधिकाऱ्याबरोबर सफाई कामगार, स्वच्छता निरीक्षक, प्रभारी स्वच्छता परीक्षक, मुकादम अशी एक टीम




असेल. काही ठिकाणी मोबाईल टॉयलेटची सोय केली आहे.

मोठ्या गणेशमूर्तींचे विसर्जन असते, त्या विसर्जन घाटावर महापालिकेतर्फे हायड्राची, क्रेनची सोय करण्यात आली आहे. महत्त्वाच्या आणि गर्दीच्या ठिकाणी आरोग्य पथक रुग्णवाहिकेसह तैनात करण्यात आले आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागास सज्ज राहण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत. ज्या ज्या ठिकाणी फायर स्टेशन आहेत तिथे शिफ्टमध्ये लोकांच्या नियुक्त्या केल्या आहेत.

या वर्षी प्रथमच विसर्जनासाठी येणारे घरगुती तसेच सार्वजनिक मंडळांचे गणपती यांच्यासाठी कोअर ओसीन सोल्युशन कंपनीच्या माध्यमातून पालिकेने एक ॲप तयार केले असून https://pmc.visarjanslots या लिंकवर नागरिकांना आपले स्लॉट बुक करता येणार आहेत. पनवेल महापालिकेच्या www.panvelcorporation या अधिकृत वेबसाईवरूनही स्लॉट बुकिंग करता येणार आहे.

## दुसऱ्या टप्प्यातील मंत्रिमंडळ विस्ताराची पितृपक्षानंतर शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**



शिंदे-फडणवीस सरकारचा दुसऱ्या टप्प्यातील मंत्रिमंडळाचा विस्तार पितृपक्ष संपल्यावर नवरात्र उत्सवामध्ये होण्याची शक्यता आहे. नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी म्हणजे, २६ सप्टेंबर विस्तार करणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इच्छुकांना सांगितल्याचे समोर आले आहे.

मुख्यमंत्री शिंदे यांनी सर्व आमदारांना स्नेहभोजनासाठी वर्षा निवासस्थानी बोलावले होते. या वेळी एकनाथ शिंदे यांनी मंत्री होण्यासाठी इच्छुक असलेल्या आमदारांच्या गटाची वेगळी बैठक घेतली. त्यांनी सर्व इच्छुक मंत्र्यांशी चर्चा केली, त्यांच्या मतदारसंघातील माहिती जाणून घेतली. आता लवकरच दुसऱ्या टप्प्यातील मंत्रिमंडळ विस्ताराची घोषणा केली जाणार आहे. विस्ताराची तयारीही पूर्ण झाली आहे. आता कोणतेही अडथळे राहिले नाही, एक-दोन मुद्यांवर चर्चा सुरू आहे, त्यावरही तोडगा निघणार आहे, असेही शिंदेंनी स्पष्ट केले.

पितृपक्ष संपल्यावर नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी २६ सप्टेंबर किंवा २७ सप्टेंबरला मंत्रिमंडळाचा विस्तार होईल, असे आश्वासन शिंदे यांनी दिले. त्याचबरोबर याच महिन्यात राज्यपाल नियुक्त १२ आमदारांची यादीही पूर्ण होणार आहे. त्या यादीतील नावेसुद्धा जाहीर केली जाणार आहे, अशी माहितीही शिंदेंनी दिली.

### निवडक

#### केंद्रीय गृहमंत्र्यांच्या सुरक्षेत चूक, एकास अटक

**मुंबई** : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर असताना एक व्यक्ती सुरक्षा भेदत त्यांच्यापर्यंत पोहचली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही व्यक्ती अमित शाह आणि इतर राजकीय नेत्यांच्या भोवती वावरत होती. हेमंत पवार असे या व्यक्तीचे नाव असून, त्याला अटक करण्यात आली आहे. त्याला मंत्र्यांसोबत फोटो काढण्याची इच्छा होती. त्याला कोर्टात हजर केले असता १२ सप्टेंबरपर्यंत कोठडी सुनावण्यात आली आहे.

राम प्रहर

**शनिवारचा अंक नाही**

**अनंत चतुर्दशीनिमित्त 'राम प्रहर'च्या कार्यालयास शुक्रवारी सुटी असल्यामुळे शनिवार (दि. १० सप्टेंबर)चा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी व हितचिंतकांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक**

## पेण तालुक्यात पावसाचा धुमाकूळ

### भाल येथे वीज कोसळून घराचे नुकसान



(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

गेले काही दिवस विश्रांती घेतलेल्या पावसाने बुधवारी (दि. ७) सायंकाळी विजेच्या गडगडाटासह हजेरी लावून पेणकरांना भांबावून सोडले. मुसळधार पावसामुळे शहरातील सर्व गटारे तुडुंब भरून वाहू लागली. अनेक दुकानांमध्ये व घरांमध्ये गटारांचे पाणी शिरले.

एसटी स्थानकाला तलावाचे स्वरूप प्राप्त झाले होते. नदीकिनारी घरांमध्ये पाणी शिरल्याने अनेकांचे नुकसान झाले. भाल गावात देविदास म्हात्रे यांच्या घरावर वीज पडून घरातील वस्तूंचे नुकसान झाले.

गावातील नैसर्गिक पाण्याचा निचऱ्याचा मार्ग बंद झाल्याने अनेक गावांमध्ये पाणी शिरून ग्रामस्थांचे नुकसान झाले आहे. गडब गावात ढगफुटीसदृश्य पाऊस होऊन ग्रामस्थांचे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीच्या परिस्थितीची पाहणी करण्याकरिता तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, मुख्याधिकारी जीवन पाटील, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, आदींसह तलाठी वर्ग यांनी ठिकठिकाणी पाहणी केली. मुसळधार पावसाने हजेरी लावली सलग दोन तास पडणाऱ्या पावसामुळे तालुक्यातील बत्तीगुल झाली होती. अथक प्रयत्नाने रात्री ९ वाजेपर्यंत वीजपुरवठा सुरळीत करण्यास महावितरण कर्मचाऱ्यांना यश आले.

महामार्गावर तसेच पेण शहरात वाहतूक कोंडी झाली होती. भाल या गावात देविदास म्हात्रे यांच्या घरावर वीज पडून घरातील वस्तूंचे नुकसान झाले. सुदैवाने जीवितहानी टळली. तालुक्यात सात घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. सायंकाळी परतणाऱ्या कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची एकच तारांबळ उडाली. गणेशोत्सव मंडळातील कार्यकर्त्यांचीही धावाधाव झाली.

### दुबईतून नागपुरात सोन्याची तस्करी

**नागपूर : प्रतिनिधी**

दुबईतून हातोडा आणि छन्नीच्या स्वरूपात सोने तस्करी करून नागपुरात आणणाऱ्या गोरखपूरच्या एकाला नागपुरात तिघांनी पाठलाग करून लुटले. या प्रकरणी गणेशपेठ पोलिसांनी तिघांना अटक केली. राहुल यादव (आजमगढ), अक्रम मलिक (नागोर, राजस्थान), ईर्शाद खान (नागोर) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून पोलिसांनी ३३६ ग्रॅम सोने जप्त केले.

गोरखपूरचा एक मजूर ५ सप्टेंबरला दुबईवरून आला. त्याला दुबईतील एका व्यक्तीने एक बॅग दिली होती. ती बॅग त्याने नागपूर विमानतळावर आलेल्या राजस्थानमधील एका व्यक्तीला दिली. यादरम्यान राहुल यादव, अक्रम मलिक आणि ईरशाद खान यांनी त्याचा पाठलाग करून ती बॅग हिसकावून नेली. याप्रकरणी गणेशपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## हाजी अली दर्गा परिसरात उभारणार सर्वात मोठा ध्वजस्तंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

हाजी अली दर्गा परिसरात जगातील सर्वात उंच ध्वजस्तंभ उभारण्यात येणार असून त्यावर भारताचा राष्ट्रध्वज लावण्यात येणार असल्याची माहिती हाजी अली दर्गाचे ट्रस्टी सोहेल खंडवानी यांनी दिली आहे. या दर्ग्याचे नूतनीकरण सुरू असून ध्वजस्तंभ उभारणीचे कामही सुरू आहे, तसेच या राष्ट्रध्वजाच्या अनावरणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमंत्रित करणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना यासंदर्भात त्यांच्याशी चर्चा झाली होती. ही कल्पना त्यांना आवडली होती. काही दिवसांपूर्वीच त्यांनी या ध्वजस्तंभाची आठवण करून दिली आणि त्याला मान्यताही दिली, असेही सोहेल खंडवानी म्हणाले, तसेच हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विविध संस्थांची मदत घेण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले.



जगातील सर्वात उंच ध्वजस्तंभ इजिप्तच्या कैरोमध्ये आहे. हा ध्वजस्तंभ २०२१मध्ये बांधण्यात आला होता. त्यापूर्वी सौदी अरेबियाच्या जेद्दाहमध्ये सर्वात उंच ध्वजस्तंभ होता.

## सामाजिक एकतेचे प्रतिक रोह्यातील भुवनेश्वरचा राजा

**रोहे : प्रतिनिधी**

गेली कित्येक वर्षे विविध जाती, धर्माच्या लोकांना सोबत घेत सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा आजही रोहा तालुक्यातील भुवनेश्वर राजाच्या गणेशोत्सवातून जोपासली आहे. कामगार चळवळीतून उभे भुवनेश्वर येथील गणेशोत्सव मंडळ उभे राहिले आहे. निरलॉन कॉलनीमध्ये गणरायाची स्थापना करण्यात येते. या वर्षी रामायणातील कुंभकर्णाचे चलचित्र मंडळाने साकरले आहे. रक्तदान शिबिरासह अनेक सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम या मंडळाच्या वतीने राबविण्यात येतात.



(छाया : महादेव सरसंबे)

रोहा तालुक्यात कुंडलिका तिरावर व कळसगिरीच्या पायथ्याशी भुवनेश्वर हे गाव वसलेले आहे. या गावात विविध समाजाचे, जातीचे कामगार एकत्रित येऊन सण, उत्सव गुण्यागोविंदाने साजरे करतात. भुवनेश्वरमध्ये सर्वात जुनी वस्ती असलेली निरलॉन कॉलनी आहे. या कॉलनीत कामगार वर्गाने १९७९ साली गणेशोत्सव साजरा करण्यास सुरुवात केली. गेली ५३ वर्षे अविरतपणे हा उत्सव तेवढ्याच दिमाखात आजही सुरू आहे.

आर्थिक मंदी व अन्य कारणास्तव कंपनीची स्थिती डबघाईस आल्यामुळे व्यवस्थापनाने कंपनी बंद करण्याचे ठरविले. त्यामुळे हा उत्सव सुरू ठेवणे जिकिरीचे होते, मात्र गणरायाचा आशीर्वाद व येथील एकत्र येऊन जय गणेश उत्सव मंडळाच्या माध्यमातून हा उत्सव पुढे सुरू ठेवण्याचा संकल्प केला व त्यांच्या संकल्पनाला यश आले. आजही जय गणेश मित्र मंडळाचा गणपती हा नवसाला पावणारा भुवनेश्वरचा राजा म्हणून प्रसिद्ध आहे. २००१ साली जय गणेश मित्र मंडळ भुवनेश्वर या नावाने मंडळ स्थापन करण्यात आले. दिवस-रात्र मेहनत घेऊन चलचित्र देखावे, मंडप उभारणी, वर्गणी गोळा करणे यासारखी अनेक कामे सर्व सदस्य करीत असतात.

गणेश चतुर्थीच्या तीन ते चार महिने आधी या कामाची सुरुवात होते. वेळोवेळी येणाऱ्या संकटातून गणरायाच्या आशीर्वादाने मार्ग काढीत मंडळाची वाटचाल सुरू आहे. सकाळ-संध्याकाळ आरती, पुजा, प्रसाद हा दिनक्रम सुरू असतो. मंडळाचे कार्यकर्ते व्यवस्थितरित्या या उत्सवाचे नियोजन करीत असतात.

### टी-२० विश्वचषकाच्या सराव सामन्यांची घोषणा

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने या वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व १६ संघांच्या सराव सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. यामध्ये टीम इंडियाला दोन सराव सामने खेळणार आहे. सराव सामने १० ते १९ ऑक्टोबर दरम्यान खेळले जाणार आहेत. सर्व सामने मेलबर्न आणि ब्रिस्बेनमध्ये होणार आहे.

टी २० विश्वचषक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व १६ संघांमध्ये १५ सराव सामने खेळवले जातील. भारतीय संघाला १७ ऑक्टोबरला ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिला सामना खेळायचा आहे, तर दुसरा सराव सामना १९ ऑक्टोबरला न्यूझीलंडकडून होणार आहे.

## शिवसेनेचे रवींद्र वायकर यांनी केला ५०० कोटींचा घोटाळा

### भाजप नेते किरीट सोमय्यांचा पत्रकार परिषदेत आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, खासदार संजय राऊत, अनिल परब यांच्यासह अनेक शिवसेना नेत्यांवर गंभीर आरोप केले आहेत. आता त्यांनी उद्धव ठाकरे यांचा तिसरा हात असलेल्या रवींद्र वायकर यांनी जोगेश्वरीच्या २००० वर्षांपूर्वीच्या महाकाली गुफा आणि रस्त्यांच्या कामात ५०० कोटी रुपयांचा घोटाळा केला, असा आरोप सोमय्यांनी केला. ते गुरुवारी (दि. ८) मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

किरीट सोमय्या म्हणाले, उद्धव ठाकरेंचा तिसरा हात रवींद्र वायकर आहे. त्यांनी एक कारनामा केला आहे. मुंबई पालिकेने मुंबईतील जोगेश्वरीच्या २००० वर्षांपूर्वीच्या महाकाली गुफा आणि तेथे जाणाऱ्या रस्त्यासाठी ५०० कोटी रुपयांचे बांधकामाचे अधिकार एका बिल्डरला दिले. हा बिल्डर अविनाश भोसले हा आहे. तेही



बहुतेक तुरुंगातच आहेत.

उद्धव ठाकरेंचा उजवा हात असलेले संजय राऊत तुरुंगात गेले. डावा हात अनिल परबांचे रिसॉर्ट तोडले जाणार आहे. फौजदारी प्रक्रिया सुरू झाली आहे. एक नाही तर तीन तीन गुन्हे दाखल झालेत. आता तिसरा हात रवींद्र वायकर आहे. त्यांचा घोटाळा बाहेर येत आहे. त्या सरकारची कृपा असणारा चौथा हात अविनाश भोसलेही तुरुंगात आहे, असे म्हणत सोमय्यांनी शिवसेना ठाकरे गटावर टीका केली.

# तरी ही कोणत्या मतांसाठी लाचारी होती?

## ■ मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा उद्धव ठाकरे यांना थेट सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई बॉम्बस्फोटातील दोषी याकुब मेमनच्या कबरीचे कोविड काळात सुशोभीकरण करण्यात आल्याचे समोर आले आहे. यावरून सध्या राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारत कबरीवरील एलईडी लाईट्स काढून टाकल्या आहेत. या मुद्द्यांवरून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि त्यांच्या तत्कालीन सरकारला भाजप नेत्यांनी धारेवर धरले आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचे मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनीदेखील निशाणा साधला आहे. याबाबत बोलताना ते म्हणाले, यासाठी ही



कोणत्या मतांसाठी लाचारी होती असा थेट सवालही त्यांनी या वेळी केला आहे.

मुनगंटीवार पुढे म्हणाले, या प्रकरणावरून टीका तर होणारच आहे. कारण जे दहशतवादी विचारांचे आहेत. या देशात दहशतवाद निर्माण करण्याच्या दृष्टीने जे लोक काम करतात ते या देशाचे शत्रू आहेत. ते एका जातीचे, धर्माचे, समुहाचे, वयाचे शत्रू नाहीत, तर या देशाचे शत्रू आहेत आणि भारतमातेच्या शत्रूचे जर तुम्ही स्मारक कराल. ज्यामध्ये न्यायमूर्तींनी या दहशतवादी विचाराला कायद्याच्या चौकटीत संपवण्याचा आदेश दिला. जो विचार देशासाठी धोकादायक आहे. त्या विचाराचे उदात्तीकरण तुम्ही कसे करू शकता? अशा शब्दांमध्ये मुनगंटीवार यांनी टीका केली. याशिवाय, माझ्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने प्रगतीसोबतच या गोष्टीकडेदेखील लक्ष दिले पाहिजे. मी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना धन्यवाद देतो. कारण एक सेकंदही न लावता त्यांनी सांगितले की, मी समिती निर्गमीत करतो आणि समितीची घोषणा करतो व गंभीरपणे चौकशी करतो. उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या माध्यमातून चौकशी करतो. यामध्ये गुप्तचर विभागाची माहिती का मिळाली नाही? मिळाली होती तर मग रोज जेव्हा मुख्यमंत्र्यांना पोलीस विभागाचे उच्चपदस्थ अधिकारी हे सर्व ठिकाणीची महत्त्वाची माहिती देत असतात, मग या घटना मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांना सांगण्यात आल्या होत्या का? सांगितल्या नसतील तर का सांगितल्या गेल्या नाहीत? जर सांगितल्या तर त्यांनी कारवाई का केली नाही? असे प्रश्नदेखील मुनगंटीवार यांनी उपस्थित केले.

# प्रत्येक जिल्ह्यात उद्धव ठाकरेंना धक्का बसेल

## भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांचे प्रतिपादन

**नागपूर : प्रतिनिधी**

शिवसेनेचे अनेक कार्यकर्ते व प्रमुख पदाधिकारी भाजपच्या संपर्कात आहेत. मागील अडीच वर्षातील महाविकास आघाडीच्या कारभाराला ते कंटाळले. आता जनतेच्या मनातील सरकारमध्ये त्यांना काम करायचे आहे, असे सांगत प्रत्येक जिल्ह्यात उद्धव ठाकरे गटाला मोठे खिंडार पडेल असे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.



पुढे बोलताना प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले, उद्धव व आदित्य ठाकरेंसोबत सेना कार्यकर्ते रहायला तयार नाही. २०२४पर्यंत त्यांच्याकडे फार कमी कार्यकर्ते राहतील आणि २०१९मध्ये केलेली चूक त्यांना कळेल. ठाकरे यांनी भाजपसोबत केलेल्या विश्वासघाताचा बदला जनता मतदानातून घेईल. वेट अँड वॉच, आश्चर्य चकीत व्हाल असे भाजपमध्ये पक्षप्रवेश होतील. आता भाजप हाच सर्वांना पर्याय आहे. विदर्भातील एकही कार्यकर्ता उद्धव ठाकरेंसोबत राहणार नाही, असा दावा भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.

गुरुवारी नागपुरात शिवसेनेचे अमरावती जिल्हाप्रमुख राजेश वानखडे, उपजिल्हाप्रमुख बोरखेडे यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांचा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश झाला. तिवसा, अमरावती येथील पाच हजार कार्यकर्त्यांसह त्यांनी प्रवेश केला.

शिवसेना पक्षातील बहुतांश कार्यकर्ते भाजपात आल्याचा बावनकुळे यांचा दावा आहे. २०१९मध्ये वानखडे यांना ६६ हजार मते मिळाली होती. आता ते अमरावती लोकसभा मतदारसंघाचे संयोजक म्हणून काम करतील. अमरावतीत जिल्हाप्रमुख राजेश वानखेडे यांच्या भाजप प्रवेशामुळे शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, राज्यभरातून अनेक कार्यकर्ते भाजपात येण्याचे पुढे येत आहे.

# शिक्षक दिनानिमित्त गव्हाण शाळेत विद्यार्थी शिक्षकांच्या भूमिकेत!

**गव्हाण : प्रतिनिधी**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये गुरूवारी (दि. १९) अभिरूप शाळा भरवून विद्यार्थ्यांनीच शिक्षकांच्या भूमिका साकारल्या व शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांचा अभिनव पद्धतीने सन्मान केला.



गणेशोत्सवाच्या सुट्टीनंतर शाळा सुरू झाल्यानंतर शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापिकेपासून तर शिपायांपर्यंत सर्व भूमिका साकारून शिक्षकांचा यथोचित सन्मान केला. शिक्षकांच्या भूमिका साकारणाऱ्या विद्यार्थ्यांनी तयारीनिशी वर्गनिहाय अध्यापन केले. आजच्या दिवशी विद्यार्थी मुख्याध्यापिका झालेल्या सानिया पाटील, उपमुख्याध्यापिका भाविका संतोष कोळी व पर्यवेक्षक प्रियांशु पाटील तसेच जुनिअर कॉलेजच्या आजच्या दिवसाच्या विद्यार्थ्यांनी प्राचार्या ललिता पुरोहित यांनी आजच्या दिनी वेळापत्रक निहाय नियोजन करून संपूर्ण दिवस अभिरुप शाळा चालविली. विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांनी सर्व विद्यार्थी शिक्षकांचे अभिनंदन केले. याप्रसंगी सर्व विद्यार्थी अध्यापक व नियमित अध्यापकांना विद्यालयाच्या वतीने लेखनी प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. समारोपाच्या कार्यक्रमात उपशिक्षक आणि रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व प्राचार्या साधना डोईफोडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक ज्योत्स्ना ठाकूर यांनी तर सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्योत्स्ना ठाकूर, हर्षला पाटील, प्रा. राजेंद्र चौधरी व प्रा. जयवंती ठाकूर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पुण्यात एटीएमची तोडफोड; रक्कम चोरीचा प्रयत्न

**पुणे : प्रतिनिधी**

एटीएमची तोडफोड करुन चोरट्यांनी रक्कम चोरीचा प्रयत्न केल्याची घटना कोंढवा भागातील कडनगर परिसरात घडली. याबाबत आयसीआयसीआय बँकेच्या कडनगर शाखेचे व्यवस्थापक अन्वर तांबोळी यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. कोंढवा भागातील कडनगर परिसरात आयसीआयसीआय बँकेचे एटीएम केंद्र आहे. चोरटे मध्यरात्री पैसे काढण्याच्या बहाण्याने एटीएम केंद्रात शिरले. चोरट्यांनी एटीएम कटरने कापण्याचा प्रयत्न केला. एटीएममधून पैसे न निघाल्याने चोरटे पसार झाले. सकाळी एटीएमची तोडफोड करुन रोकड चोरीचा प्रयत्न करण्यात आल्याचे उघडकीस आले. त्यानंतर तांबाळी यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. एटीएम केंद्राच्या आवारातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासासाठी ताब्यात घेण्यात आले असून सहायक पोलीस निरीक्षक रत्नदीप बिराजदार तपास करत आहेत.

# मुसळधार पावसामुळे नाशिक पुणे महामार्गावर पाणीच पाणी

**अहमदनगर : प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यापासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे नाशिक–पुणे राष्ट्रीय महामार्गावर पाणीच पाणी झाले आहे. पाण्यातून कशीबशी वाट काढत वाहने जात होती. तर पावसामुळे वाहने बंद पडण्याचे प्रकार घडत आहेत. मागील पाच ते सहा दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे ओढे–नाले तुडूंब भरले आहेत. डोंगरावरील पाणी महामार्गावर येत होते.



रस्त्याची कामे करताना अनेक ठिकाणी नाली बांधली गेली नाहीत. यामुळे पावसाचे पाणी थेट रस्त्यावर येऊन साचते आहे. संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी घाट परिसरातील महामार्ग डोळसणे पोलीस मदत केंद्रासमोरील पुण्याकडून नाशिककडे जाणाऱ्या लेनवर पाण्याचे तळे साचले आहे. त्यातून मार्ग काढताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. एकाच बाजूने वाहतूक सुरू होती. दरम्यान, राज्यभरात परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. गणेशोत्सवात पहिले पाच दिवस पाऊस थांबला होता. त्यानंतर मात्र पावसाने बऱ्याच ठिकाणी जोर धरला आहे.

# वाहनासाठी आकर्षक नोंदणी क्रमांक

**नवी मुंबई : बातमीदार**

पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये खासगी चारचाकी मोटार वाहनांच्या नवीन नोंदणीसाठी MH46 CG ही नवीन मालिका लवकरच सुरु होत असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल यांनी कळविले आहे. या मालिकेतील आकर्षक/अनाकर्षक नोंदणी क्रमांक राखीव करायचे असल्यास नागरिकांनी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयात संपर्क साधावा.

शासनाने महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५७अ नुसार विहित केलेले आकर्षक नोंदणी क्रमांक व त्यासाठीचे शुल्क याबाबतची सविस्तर माहिती, पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. एकाच नोंदणी क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्जदारांनी अर्ज केल्यास उक्त नमूद तरतूदीनुसार नोंदणी क्रमांकासाठी लिलाव होईल.

# कट्टर शिवसैनिकाची उद्धव ठाकरेंवर नाराजी

## पक्षाला केला रामराम; भाजपमध्ये केला प्रवेश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यभरातून एकनाथ शिंदे गटाला वाढत असलेला पाठिंबा शिवसेनेसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे पक्ष आणि संघटना वाचवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करत असल्याचे पाहायला मिळत आहेत. आदित्य ठाकरे हेदेखील कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेताना दिसत आहेत. यातच महाविकास आघाडीची सत्ता स्थापन झाल्यामुळे उद्धव ठाकरेंवर नाराज असलेल्या एका कट्टर शिवसेना कार्यकर्त्यांने अखेरीस पक्षाला रामराम करत भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

२१वर्षांपासून शिवसेना आयटी सेलचे प्रमुख आणि गुजरात राज्याचे संपर्क प्रमुख म्हणून काम पाहिलेल्या रमेश सोळंकी यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. शिवसेनेने काँग्रेससोबत हातमिळवणी करत महाविकास आघाडी सरकार स्थापन केले, तेव्हाच सोळंकी यांनी युवासेना–शिवसेनेच्या पदावरुन राजीनामा दिला होता. मात्र आता त्यांनी अधिकृतपणे भाजपात प्रवेश केला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत सोळंकी यांनी हाती कमळ घेतले. सोळंकी हे शिवसेनेचे कट्टर कार्यकर्ते आहेत. २१ वर्षांपासून शिवसेनेत कार्यरत आहेत. मुंबईत १५ हजार कार्यकर्त्यांसोबत त्यांनी काम केले आहे. त्यांचे मोठे प्रभावक्षेत्र राहिले आहे.

सोळंकी यांनी भाजपात पक्ष प्रवेश केला. पक्ष वाढीस ते अहोरात्र मेहनत घेतील, अशी अपेक्षा आहे. भाजप त्यांना सन्मानाने चांगले काम देईल असे मी आश्वस्त करतो, असे चंद्रशेखर बावनकुळे यावेळी म्हणाले.दरम्यान, मागील दोन महिन्यापासून शिवसेनेला लागलेली नेत्यांची गळती थांबण्याचे चिन्हे नाही.

# जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराजांचा पादुका दर्शन सोहळा

**उरण : रामप्रहर वृत्त**

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज दक्षिणपीठ नाणीजधाम महाराष्ट्र यांचा पादुका दर्शन सोहळा उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे सोमवारी (दि. १२) सकाळी १०पासून होणार आहे.

या दिवशी जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज यांच्या सिद्ध पादुकांसमवेत गुरुपुजनाचा, प्रवचनाचा व दर्शनाचा लाभ उपस्थित भाविक भक्तांना व हितचिंतकांना मिळणार आहे. तसेच या दिवशी हजारो भक्तगण उपासक दीक्षा घेणार असून ज.न.म. संस्थानच्या सामाजिक उपक्रमांतर्गत गरीब आणि गरजू महिलांना मोफत घरघंटी वाटप करण्यात येणार आहेत. अध्यात्म विज्ञान व्यवहार यांची सांगड घालून सुखी जीवन कसे जगता येईल, मानवी मनाचा विकास कसा साध्य होईल, तसेच भारतीय संस्कृतीचे जतन यावर उद्बोधक मार्गदर्शन प्रवचनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजक जिल्हा सेवा समिती उत्तर रायगड यांनी केले आहे.

# कष्टकरी नगर येथे रक्तदान शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी रेल्वे स्थानकानजीकच्या कष्टकरीनगर येथे सार्वजनिक गणेश उत्सवानिमित्ताने जय हनुमान सामाजिक विकास मंडळ यांच्यावतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यातच रुग्णांना हॉस्पिटलमध्ये सतत रक्ताची कमतरता भासत असते ही गरज लक्षात घेऊन रोटरी क्लब ब्लड बँक कामोठे यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.





या वेळी रक्त दात्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. रक्तदान हेच श्रेष्ठदान मानून रक्तदान केल्यानंतर त्यांना चहा, बिस्कीट देण्यात आले.

भाजपचे जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गाताडे यांनी रक्तदान करून आपला सहभाग नोंदवला. या वेळी ज्येष्ठ कार्यकर्ते काका गायकवाड, भाजप रसायनी युवा अध्यक्ष प्रतीक भोईर, माजी उपसरपंच विश्वनाथ गायकवाड, युवा कार्यकर्ता सुनील राठोड, सामाजिक कार्यकर्ते दादा आटपाडकर, संदीप गायकवाड, विनोद कांबळे, विजय गायकवाड, राहुल आरडे, परमेश्वर गायकवाड, प्रथमेश गायकवाड, सुभाष कोकणे, वैभव गायकवाड, सचिन चांदणे, अजय चांदणे आदी या वेळी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अविनाश गाताडे आणि प्रतीक भोईर यांचे विशेष सहकार्य लाभले.

# पुण्यात पाच दिवसांत पीएमपीला ८ कोटी २७ लाखांचे उत्पन्न

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी–चिंचवड शहरातील प्रमुख सार्वजनिक वाहतूक असलेल्या पीएमपीला गणेशोत्सवातील पाच दिवसात आठ कोटी २७ लाखांचे उत्पन्न मिळाले आहे. त्याचबरोबरच विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून दोन लाख ९१ हजार ६०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. गणेशोत्सव कालावधीत शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांनी गणपतीची केलेली रोषणाई आणि विविध देखावे–सजावटी पाहण्यासाठी उपनगर तसेच बाहेरगावाहून अनेक नागरिक शहरात येत असतात. त्यामुळे प्रवाशांच्या सोईसाठी पीएमपीकडून जादा गाड्यांची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. दोन वर्षानंतर निर्बंधमुक्त पद्धतीने यंदा गणेशोत्सव साजरा होत असल्याने यंदा पीएमपीकडू तब्बल ६५४ जादा गाड्या संचलनात आणण्यात आल्या. तसेच रात्री दहा वाजल्यानंतर मार्गावरील सर्व गाड्या यात्रा विशेष म्हणून जाहीर करण्यात आल्या होत्या. त्यानुसार तीन सप्टेंबर ते सात सप्टेंबर या पाच दिवसांच्या कालावधीत पीएमपीला आठ कोटी २७ लाख ४५ हजार ७३२ रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाल्याची माहिती पीएमपी प्रशासनाकडून देण्यात आली. या पाच दिवसांत ५७ लाख ४३ हजार २४८ प्रवाशांनी प्रवास केला.

# होप फॉर चिल्ड्रन्सकडून मोफत वैद्यकीय शिबिर





**मोहोपाडा : प्रतिनिधी**

होप फॉर चिल्ड्रेन (समुदाय विकास प्रकल्प) यांच्या वतीने इंदिरा नगर, शिवाजी नगर, नवनाथ नगर, आदिवासीपाडा येथील गरीब समाजासाठी मोफत वैद्यकीय शिबिर आयोजित करण्यात आले होते. दरम्यान, या शिबिराचा ३३५ विद्यार्थ्यांनी व आसपासच्या परिसरातील नागरिकांनी लाभ घेतला.

प्रकल्प अधिकारी महेश राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर उत्साहात झाले. या शिबिरात पनवेल महानगरपालिकेच्या वतीने डॉक्टरांची टिम उपस्थित होती. तज्ञ डॉक्टरांनी नागरिकांना आजारविषयक मार्गदर्शन केले. या शिबिरासाठी बिलिवर्स ईस्टर्न चर्च व मुंबई डायोसिसचे बिशप मार्टिन, अप्रेम एपिस्कोपा, नगरसेवक अजय बहिरा, जयेश परमार, रमेश वळवी आदी उपस्थित होते.


आरोग्याच्या बाबतीत काही नागरिक पाहिजे तेवढे गांभीर्य ओळखून घेत नसल्यामुळे अनेक समस्या उद्भवतात आणि आरोग्यविषयक संकटांना सामोरे जावे लागते, हेच धोरण स्वीकारून या प्रकल्पांतर्गत शिबिर आयोजित करण्यात आल्याचे समजते.

पान १ वरून

## प्रशासनाचे सुशासन व्हावे -मुख्यमंत्री

लहरी हवामानामुळे अतिवृष्टी, दुष्काळ यासरख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते. यासाठी नैसर्गिक आपत्तींबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करून नागरिकांना दिलासा देण्यासाठी या समितीने त्याचा सुशासन नियमावलीमध्ये समावेश करावा, अशी सूचनाही त्यांनी केली.

आदिवासी भागात कुपोषणासारखी समस्या कायमच भेडसावते. अशा वेळी योजना, त्यांच्या अंमलबजावणीतील त्रुटी शोधून त्यावर उपाययोजना सुचवाव्यात. दप्तर दिरंगाई कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्यासाठी नियमावलीमध्ये त्याचा समावेश करावा. लोकांचे काम वेळेवर झाले तरच त्याला सुशासन म्हणता येईल, नागरिकांना कामांसाठी शासकीय कार्यालयात हेलपाटे मारावे लागू नयेत, क्षेत्रीय स्तरावरच त्यांच्या समस्यांचा निपटारा व्हावा मंत्रालयापर्यंत त्यांना यायची गरज भासू नये, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शुक्रवार, दि. ९ सप्टेंबर २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

## निवडक

### दुचाकीच्या धडकेत एक जखमी

**पनवेल :** मुंबई-पुणे हायवेवर मुंबईकडे जाणाऱ्या रोडवर ठोंबरेवाडी येथे दुचाकी चालकाची एका व्यक्तीला ठोकर बसली. यात संजय कदम हे जखमी झाले आहेत. अज्ञात मोटरसायकल चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विचुंबे येथील संजय कदम हे त्यांचे टीव्हीएस कंपनीची जुपिटर मोटरसायकल (एमएच ४६ बीडब्ल्यू १८९२) वरून घरी जात होते. ते ठोंबरेवाडी जवळ आले असता पाऊस येऊ लागल्याने रस्त्याच्या बाजूला थांबून रेनकोट घालत होते. या वेळी अज्ञात मोटरसायकलवरील चालकाची त्यांना ठोकर बसली. या अपघातात त्यांचा डावा हात फ्रॅक्चर झाला आहे.

### आकुर्ली येथील एक जण बेपत्ता

**पनवेल :** आकुर्ली येथील ३९ वर्षीय संदीप कमलाकर धरणेकर हा कोणाला काहीही न सांगता निघून गेला आहे. त्यामुळे तो हरवला असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तो रंगाने सावळा, उंची पाच फूट, सात इंच, चेहरा उभट व अंगाने मजबूत आहे. त्याने अंगात पिवळा शर्ट व काळी पॅन्ट घातली आहे. त्याने पायात काळे पावसाळी बूट घातले असून त्याला हिंदी, मराठी भाषा अवगत आहे. संदीपबाबत कोणाला माहिती असल्यास पोलीस नाईक नवनाथ लवटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### फुंडे महाविद्यालयात शिक्षक दिन

**उरण :** फुंडे महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ.पी. जी. पवार यांनी विविध विषयांवर भाष्य केले. महाविद्यालयातील डॉ. एम. सी. सोनवणे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचेही स्वागत करण्यात आले, तसेच हिंदी विभागप्रमुख डॉ. झेलम झेंडे, डॉ. सुजाता पाटील यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. विलास महाले उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. राम गोसावी, सूत्रसंचालन डॉ. सुजाता पाटील यांनी केले आणि उपस्थितांचे आभार प्रा. चिंतामण धिंदळे यांनी मानले.

### कोन गावातून बांगलादेशी ताब्यात

**पनवेल :** बेकायदेशीररित्या भारतात प्रवेश करून वास्तव्य करणाऱ्या पाच बांगलादेशींविरुद्ध पनवेल तालुका पोलिसांनी तालुक्यातील कोन गाव परिसरात कारवाई केली आहे. कोणत्याही वैद्य प्रवासी कागदपत्राशिवाय अवैधरीत्या भारत-बांगलादेश सीमेवरून भारतीय हद्दीत घुसखोरी करून भारतात प्रवेश केला व पनवेल तालुक्यातील कोन हद्दीत पाच जण अनधिकृतरित्या वास्तव्य करत असल्याची माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रवींद्र दौंडकर यांना मिळाली. यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने धडक कारवाई करत त्यांना ताब्यात घेतले आहे.

# मतदाराच्या 'आधार'साठी रविवारी शिबिर

**पनवेल : प्रतिनिधी**



निवडणूक कायदा (सुधारणा) अधिनियम २०२१ अन्वये लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. यामधील कलम २३ नुसार मतदार याद्यातील तपशीलाशी आधार क्रमांक जोडण्याकरिता आणि प्रमाणिकरणासाठी मतदारांकडून ऐच्छिकपणे आधारची माहिती संग्रहित करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत रविवारी (दि. ११) पहिले विशेष शिबिर सर्व मतदान केंद्रावर आयोजित करण्यात येणार आहे.

मतदार नोंदणी नियम १९६० मधील नियम २६ इ नुसार फॉर्म नं. ६ ब तयार करण्यात आला आहे. या सुधारणांची अंमलबजावणी १ ऑगस्ट, २०२२पासून लागू झालेली आहे. मतदार नोंदणी अधिकारी (ईआरओ) यांना मतदार यादीत असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून विहित स्वरुपात आधार क्रमांक मिळविण्यासाठी वैधानिकरित्या प्राधिकृत करण्यात आलेले आहेत. विद्यमान मतदारांकडून आधार संकलनाचा उद्देश मतदारांशी ओळख प्रस्थापित करणे आणि मतदार यादीतील नोंदीचे प्रमाणीकरण करणे आणि एकापेक्षा जास्त मतदारसंघात किंवा एकापेक्षा जास्त वेळा त्याच मतदारसंघात एकाच व्यक्तीच्या नावाची नोंदणी ओळखणे, हा आहे. या कार्यक्रमाचा उद्देश कायदेशीर तरतुदीस अनुसरुन आहे. तथापि, आधार क्रमांक सादर करणे, हे मतदारांच्या वतीने ऐच्छिक आहे, असल्याचे आयोगाने स्पष्ट केलेले आहे.

मतदारांना त्यांचा आधार क्रमांक भरण्यासाठी अर्ज क्रमांक ६ ब भारत निवडणूक आयोगाच्या आणि मुख्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच, मतदारांना ऑनलाइन पध्दतीने आधार क्रमांक भरण्यासाठी अर्ज क्रमांक ६ ब एनव्हीएसपी, व्हीएचए या माध्यमांवरदेखील उपलब्ध आहे. तसेच अर्ज क्रमांक ६ ब च्या छापील प्रतीदेखील संबंधित तहसील कार्यालयाकडून उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. ऑनलाइन पध्दतीने आधार क्रमांक भरण्यासाठीची सुविधा पोर्टल अथवा ॲपच्या माध्यमातून स्व-प्रमाणीकरण व स्व-प्रमाणिकरणाशिवाय ऑनलाइन पध्दतीने आधार क्रमांक भरता येत आहे.

भारत निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या पोर्टल अथवा ॲपच्या माध्यमातून मतदार ऑनलाइन पध्दतीने अर्ज क्रमांक ६ ब भरून आधार क्रमांक नोंदवू शकतो आणि यूआयडीएआयकडे नमूद असलेल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त ओटीपीद्वारे आधारचे प्रमाणीकरण करू शकतो. तथापि तपशिलात फरक असल्यास प्रमाणिकरण अपयशी ठरण्याची शक्यता आहे. मतदारास स्व-प्रमाणिकरण करावयाचे नसल्यास किंवा वरीलप्रमाणे प्रमाणिकरण अपयशी ठरत असल्यास, मतदार स्व-प्रमाणिकरणाशिवाय ऑनलाइन पध्दतीने त्याचा अर्ज क्रमांक ६ ब भरून त्यासोबत योग्य दस्तावेज सादर करू शकतो.

घरोघरी भेट देऊन मतदारांकडून छापील नमुना अर्ज क्रमांक ६ ब द्वारे स्वेच्छेने आधार क्रमांक गोळा करण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत ११ सप्टेंबर रोजी पहिले विशेष शिबिर सर्व मतदान केंद्रावर आयोजित करण्यात येणार आहे.

मतदारांनी आपल्या मतदार यादीतील तपशिलाशी आधार क्रमांक संलग्न करून प्रमाणिकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर आणि उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे यांनी केले आहे.

## रयत बँकेच्या वार्षिक अहवालाचे वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वर्ष २०२१-२२ च्या ८२ व्या वार्षिक अहवालाचे वितरण रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या साधना डोईफोडे व रयत को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक तथा रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, गुरूकुल प्रमुख संदीप भोईर यांचे हस्ते करण्यात आले.

या वेळी क्रीडाशिक्षक जयराम ठाकूर, उपशिक्षक एकनाथ ठाकूर व सागर रंधवे तसेच उपशिक्षिका वृषाली म्हात्रे व सर्व सेवक उपस्थित होते. विद्यालयाचे गुरूकुल प्रमुख संदीप भोईर यांना या वेळी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.



## 'शिव संकल्प'चा गणेशोत्सव उत्साहात

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे सेक्टर ३६, प्लॉट नंबर २० येथे शिव संकल्प सोसायटीतील रहिवाशांद्वारे कोरोना काळानंतरचा पहिला गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. सोसायटीतील स्त्री पुरुष आबालवृद्ध आणि लहान बालगोपाल मंडळी मोठ्या उत्साहाने बाप्पाच्या आरतीला एकत्रित येत असतात.

सोसायटीमधील लहान मुला मुलींच्या कलाकौशल्याला वाव देण्यासाठी मंडळातर्फे यावर्षी चमचा लिंबू स्पर्धा, संगीत खुर्ची, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, फॅन्सी ड्रेस स्पर्धा आणि नृत्य स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले. मोठ्या संख्येने लहान मुलामुलींनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला.



भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजप कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक विकास घरत, विजय चिपळेकर आदींनी या गणरायाची दर्शन घेतले. दरम्यान, अध्यक्ष नानासाहेब वलेकर, खजिनदार आलम शेख आणि राजेश धनावडे, अशोक मिसाळ, अशोक महाडिक, किरण भोर, रोहन गावकर, दयानंद राऊत, बाळासाहेब दुधाळ, आनंद उथळ, अविनाश मोरे, संतोष पांढरे, संतोष शेटे, सचिन जाधव, विलास जाधव, नरेंद्र दाभोलकर, विनोद गायकवाड, प्रकाश कुलकर्णी, संदिप संत्रा यांच्या परिश्रमाने गणेश उत्सव उत्साहात साजरा होत आहे.

# भाजपच्या विजय भोईर यांचे कौतुक

**तब्बल ५५ वेळा रक्तदान करून जपली सामाजिक बांधिलकी**

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

भाजपचे नवघर जिल्हा परिषद गटाचे जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी राजे शिवाजी मित्र मंडळ कोटनाका येथे गणेशोत्सव निमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ५५ वे रक्तदान केले. या अगोदर ५४ ठिकाणी त्यांनी रक्तदान केले आहे. या त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे आमदार महेश बालदींसह विविध मान्यवरांनी कौतुक केले आहे.





उरण तालुक्यात कोणाला रक्ताची गरज असल्यास ते तातडीने पुरवितात. रक्तामुळे कोणाचा जीव जाऊ नये. मृत्यूच्या दारात असलेल्या प्रत्येक व्यक्तीला रक्त मिळालेच पाहिजे, अशी भावना विजय भोईर यांची आहे. त्यामुळे विजय भोईर हे याच सामाजिक भावनेतून रक्तदान करीत असतात. विजय भोईर हे अनेक वर्षांपासून राजकारणात आहेतच शिवाय विजय विकास सामाजिक संस्थेचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत. या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक उपक्रमही ते राबवित असतात. प्रत्येक कार्यात विजय भोईर व त्याचे भाऊ विकास भोईर हे नेहमी अग्रेसर असतात.

विजय भोईर यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत आमदार महेश बालदी, भाजप उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, लायन्स क्लबचे उरणचे अध्यक्ष सदानंद गायकवाड व इतर मान्यवरांनी विजय भोईर यांच्या समाज कार्याचा, रक्तदानाचे कौतूक करत त्यांचा गौरव केला आहे.

## गुळसुंदे येथे गरजू ग्रामस्थांना भांडीवाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुळसुंदे ग्रुपग्रामपंचायत येथे गुळसुंदे, आकुळवाडी, लाडीवली येथील पाच आदिवासीवाड्या व एक बौद्धवाडी यांना १५ टक्के अनुदानातून मागासवर्गीयांना भांडी वाटप करण्यात आली.

सरपंच हरिश्चंद्र लक्ष्मण बांडे, ग्रामविकास अधिकारी रामदास बाबाजी दासगांवकर, उपसरपंच शांताराम रघुनाथ मालुसरे तसेच ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते १५ टक्के अनुदानातून सार्वजनिक लाभापोटी जेवणाची मोठी भांडी,



खुर्ची, शेगड्या, स्पिकरसेट वाटप करण्यात आले. त्याबद्दल सर्वांनी ग्रामपंचायतीचे कौतुक केले आहे.

## सीकेटी महाविद्यालयात विशेष अतिथी सत्र

### पोपटराव पवार यांचे जलसंधारण व ग्रामीण विकास विषयक मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या औचित्याने महाविद्यालयाच्या ग्रामीण विकास विभागाचा वतीने गुरुवारी जलसंधारण आणि ग्रामीण विकास विषयक विशेष अतिथी सत्राचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम पद्मश्री, आदर्श ग्राम हिवरे बाजारचे उपसरपंच तथा भारत सरकारच्या जलसंधारण सुकाणू समितीचे सदस्य पोपटराव पवार यांची उपस्थितीत झाला.



पोपटराव पवार यांनी ग्रामीण विकासाचे विविध पैलू, जलसंधारणाचे महत्त्व, माती आणि पाण्याचे असणारे अनन्य स्थानासंदर्भात विद्यार्थ्यांनी माहिती दिली. यासोबतच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाच्या कीर्तीचा मागोवा घेतला.

या वेळी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, कलाशाखा प्रमुख डॉ. बी. एस. पाटील, वाणीज्य शाखा प्रमुख डॉ. एस. बी. यादव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर, इतिहास विभागाच्या प्रमुख डॉ. आर. डी. म्हात्रे, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.आर. व्ही. येवले, भूगोल विभाग प्रमुख डॉ. डी. एस. नारखेडे, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मंदा म्हात्रे, अर्थशास्त्र विभागाचे के. एन. ढवळे, हिंदी विभागाच्या डॉ. गीतिक तंवर यांच्यासह विद्यार्थी आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामीण विकास विभागाच्या प्रमूख डॉ. एस. एम. भोईर यांच्या नेतृत्वाखाली भावेश भोईर आणि आकाश पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.




## गणेश दर्शन



पनवेल : सोमाटणे येथे चंद्रकांत बैकर, सुशील बैकर यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या गणरायाचे भाजप महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, लिना पाटील यांनी दर्शन घेतले. या वेळी शुभांगी बैकर, शितल बैकर, रुपाली तोंडे उपस्थित होते.



खारघरचा राजा हा इको फ्रेंडली असून मूर्तिकार भरत पाटील यांनी सद्ध्याच्या हवेच्या प्रदुषणामुळे २५ वर्षांनंतर पृथ्वी काळी झालेली असेल असा देखावा सादर केला आहे. या गणपतीचे विसर्जनही पर्यावरणपूरक पद्धतीने गोखले हायस्कूल मैदानात ड्रममध्ये करण्यात येते.



तानाजी देशमुख, नेरळ, माणगाव



प्रदीप भोईर, कर्नाळा नाका, पनवेल



नवी मुंबई : आद्य गणेश मंडळाने सीबीडी येथे १२ फूट उंचीची टिशू पेपर कागदापासून बनवलेली भव्य गणेशमूर्तीची स्थापना केली. त्यामुळे या पर्यावरणपूरक बाप्पाने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले.

## संपादकीय

# निरर्थक पायपीट!

भारतातील जनतेने आपल्याला सपशेल नाकारले आहे, ही वस्तुस्थिती काँग्रेस पक्षाला अजूनही पुरती समजलेली दिसत नाही. म्हणूनच जनतेने पुन्हा पुन्हा नाकारलेले काँग्रेसचे नेतृत्त्व विनाकारण मतांसाठी धडपड करताना दिसते. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी बुधवारपासून ‘भारत जोडो’ पदयात्रेचा प्रारंभ केला. हा मतांसाठीच्या प्रयासांचाच एक भाग म्हटला पाहिजे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांना भारतीय जनतेने पूर्णत: स्वीकारले आहे, हे सत्य अजूनही काही विरोधी पक्षांच्या पचनी पडलेले नाही, असे दिसते. गेली आठ वर्षे भारतीय जनता पक्षाचे सरकार केंद्रात धडाक्यात निर्णय घेते आहे, आणि मतदारांना आपण योग्य व्यक्ती आणि पक्षाच्या हाती कारभार सोपवल्याचे समाधान मिळू लागले आहे. हे सुख जनतेला काँग्रेसच्या राजवटीत एक दिवसदेखील मिळाले नव्हते, हे लक्षात घ्यायला हवे. दिवसेंदिवस पंतप्रधान मोदी यांचे समाजमनातील स्थान अढळ होताना दिसते, तेवढीच काँग्रेसची वेगाने घसरण होतानाही दृष्टीस पडते. तूर्तास, कन्याकुमारी ते काश्मीर हा तीन हजार ५७० किलोमीटरचा प्रवास राहुल गांधी पायी करणार आहेत. बारा राज्यांतील वीस शहरांमध्ये त्यांची ही पदयात्रा जाईल. एकंदरित दीडशे दिवसात ती संपेल, असे नियोजन आहे. पक्षवाढीसाठी कोणी प्रयत्न करत असेल, तर त्यास आक्षेप घेण्याचे कारण नाही. लोकशाहीत प्रत्येक पक्षाला तशी मुभा असतेच. परंतु, काँग्रेसने आरंभलेल्या या तथाकथित पदयात्रेचे नाव ‘भारत जोडो’ असे असले तरी प्रत्यक्षात ते ‘मतदार जोडो’ किंवा ‘काँग्रेस जोडो’ असेच आहे. एकेकाळी संपूर्ण देशावर हुकूमत गाजवणारा हा पक्ष आता मुळात कालबाह्य ठरत चालला आहे. या पक्षातील नेतृत्त्वाला देशहितामध्ये काही रस नाही, आणि दुसऱ्या–तिसऱ्या फळीतील नेत्यांना जनतेत स्थान उरलेले नाही. कार्यकर्त्यांची फळी तर जवळपास जमीनदोस्त झाली आहे. स्वत:चेच घर ठीक करण्यासाठी काँग्रेसची अखेरची धडपड म्हणजे ही ‘भारत जोडो’ यात्रा, असेच म्हणावे लागेल. एवढा मोठा उपक्रम हाती घेऊनही खासदार राहुल गांधी यांच्या पदरी फारसे काहीही पडणार नाही, हे उघड आहे. मुळात ही पदयात्रा नावाचीच पदयात्रा आहे. एसी, पंखे, मोठे कंटेनर गांधी यांच्या दिमतीला असणार आहेत. या आलिशान कंटेनरमध्ये गांधी यांचा मुक्काम पलंग, गाद्यागिरद्या यांनी सुसज्ज असा असेल, आणि तंबूत कार्यकर्त्यांसमवेत ते जेवण घेतील. उर्वरित वेळेत ते जमेल तशी पदयात्रा करतील, असे दिसते. साधनसुविधांची रेलचेलदेखील एकवेळ समजून घेण्याजोगी आहे. या यात्रेतील वाहनांवर गांधी परिवाराचे वादग्रस्त जावई रॉबर्ट वढेरा यांची मोठमोठाली पोस्टर्स चिकटवण्यात आली आहेत! काँग्रेस पक्ष अजूनही गांधी परिवाराचा पिच्छा सोडायला तयार नाही, याचेच हे द्योतक मानावे लागेल. भारत जोडो’च्या नावाखाली मतांचे राजकारण करण्याचा हा दांभिकपणा काँग्रेस पक्ष जितक्या लवकर सोडेल, तितका त्यांनाच फायदा होऊ शकेल. खरे तर पक्ष वाचवण्याचा असा कुठलाही प्रयत्न करण्यास काँग्रेस नेतृत्त्वाला आता खूप उशीर झाला आहे. पंतप्रधान मोदी यांचे भारतीय जनतेशी घट्ट नाते गेल्या आठ वर्षात निर्माण झाले आहे. असल्या पदयात्रांच्या डावपेचांचा या नात्यावर काहीही परिणाम होण्यासारखा नाही. म्हणूनच खासदार राहुल गांधी यांची ही पदयात्रा म्हणजे निरर्थक पायपीट वाटते. या यात्रेच्या निमित्ताने त्यांना खरा भारत कसा राहातो, हे कळले तरी खूप झाले, असे म्हणायचे.**

# पाणीटंचाईची दुसरीही बाजू समजून घ्या!



## खबरबात
प्रकाश सोनवडेकर

अलिबाग तालुक्यात पाणी टंचाईचा प्रश्न आता गंभीर होऊ लागला आहे. काही ग्रामपंचायतीमध्ये पावसाळ्यात देखील टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. तसेच काही ग्रामपंचातींमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने अलिबाग येथील एमआयडीसी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आले. अधिकाऱ्यांना घेरावही घालण्यात आला. पाणी पुरवठा सुरळीत करण्याची मागणी या वेळी करण्यात आली. जनतेला पाणी मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. ही एक बाजू आहे. पाणी पुरवठा होत नाही याचे कारण म्हणजे थकलेली पाणीपट्टी व जलवाहिन्यांना अनेक ठिकाणी मारलेले टॅब होय. पाणी न मिळण्याची ही दुसरी बाजू आहे तीदेखील समजून घेतली पाहिजे. पाण्याचे स्त्रोत उपलब्ध असलेल्या अलिबाग शहर आणि तालुक्यातील अनेक गावांना एमआयडीसीकडून पाणीपुरवठा केला जातो. अलिबागमधील औद्योगिक कंपन्यांना पुरवठा केल्यानंतर उरणारे पाणी हे या शहर आणि गावांना उपलब्ध करून दिले जात असते. यासाठी ठराविक रक्कम एमआयडीसी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून पाणी बिलाच्या स्वरुपात आकारणी करत असते. मात्र ही रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थाकडून वेळेवर भरली जात नाही. अलिबाग नगरपालिका, ४० ग्रामपंचायती आणि जिल्हा परिषद यांच्याकडून १३१कोटी रुपये पाणीपट्टी एमआयडीसीला येणे बाकी आहे. वारंवार पाठपुरावा करूनही पाणीपट्टी थकबाकीची रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थाकडून भरली जात नाही. एमआयडीसीकडून पाणीपुरवठा कमी दाबाने होत असल्याची तक्रार ग्रामपंचायतीकडून केली जात आहे. पाणीपुरवठा सुरळीत करा अशी मागणी त्यांनी केली आहे. एमआयडीसी, पंचायत समिती कार्यालयावर मोर्चे काढून अधिकाऱ्यांना घेराव घातला जात आहे. अधिकाऱ्यांना धमकाविले जाते. पण पाणीपट्टी थकबाकीबाबत कुणी काही बोलत नाही. एमआयडीसी कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार अलिबाग नगर पालिकेने २० कोटी ६८ लाख रुपये थकविले आहेत.
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जिल्हा परिषद पायलट योजनेंतर्गत होणाऱ्या पाणी पुरवठ्यापोटी ४५ कोटी ६१ लाख रुपयांची रक्कम थकली आहे.

जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभाग अंतर्गत पाणीपुरवठा योजनेतील पाणी पुरवठ्यासाठी १० कोटी ४६ लाख रुपयांची रक्कम येणे शिल्लक आहे. तर ३३ ग्रामपंचायतींकडे ५४ कोटी २६ लाखांची थकबाकी आहे. पोयनाड, बांधन, देहेन, चेंढरे, आंबेपूर, कामार्ले, चरी, कुरुळ, खंडाळे, नागोठणे आणि शहाबाज या ग्रामपंचायतींकडे करोडो रूपयांची पाणीपट्टी थकबाकी आहे. वाघोडे, परहूरपाडा, खिडकी, बामणगाव, काविर, वेश्वी, वढाव, खानाव, मान तर्फे झिराड या ग्रामपंचायतींनी लाखो रूपयांची पाणीपट्टी भरलेली नाही. वाडगाव, नवेदर बेली, नवेदर नवगाव, ढवर, सहाणगोटी, सहाण या ग्रामपंचातीचीदेखील पाणीपट्टी भरलेली नाही. याही परिस्थितीत एमआयडीसीकडून ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा केला जात आहे. एमआयडीसीने दिलेली माहिती खोटी असेल तर त्याच्या विरोधात आवाज उठविला पाहिजे आणि जर खरेच पाणीपट्टी थकली असेल तर ती भरली पाहिजे असे नागरिकांचे म्हणणे आहे.

ज्या ग्रामपंचायतींना एमआयडीसीकडून पाणीपुरवठा केला जातो. त्यांनी पाणी पुरवठ्याची देयके वेळेत भरणे आवश्यक आहे पण तसे होत नाही. ग्रामपंचायती पाण्यासाठी आग्रही असतात, पण पाणीपुरवठा देयके भरण्यास टाळाटाळ करतात. एमआयडीसीने थकबाकीदार ग्रामपंचायती नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना या संदर्भात नोटीसाही दिल्या आहेत. तरीदेखील पाणीपट्टी भरली जात नसेल तर कारवाई होणारच.



जर लोक पाणीपट्टी भरत असतील तर मग ही जमा झालेली रक्कम एमआयडीसीकडे का वळती केली जात नाही. या प्रश्नाचे उत्तर शोधले पाहिजे. जर लोक पाणीपट्टी भरत नसतील तर ती वसूल करण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची आहे. आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडायची नाही आणि त्याचे खापर मात्र दुसऱ्यांवर फोडायचे. हे केव्हाही उचित ठरणार नाही.

एमआयडीसी उद्योगांना पाणीपुरवठा करते. त्यातून उरलेले पाणी ग्रामपंचातींना देते. त्याची पाणीपट्टी ग्रामपंचायतींनी भरलीच पाहिजे. ही पाणीपट्टीभरूनही जर पाणीपुरवठा व्यवस्थित होत नसेल तरच आपल्याला एमआयडीसीवर पाण्यासाठी मोर्चा काढण्याचा अधिकार आहे. एमआयडीसी ज्या जलवाहीन्यांमधून पाणीपुरवठा करते त्यांना टॅब लावून पाणी चोरणारे लोक आहेत. त्यांच्यामुळे शेवटच्या गावापर्यंत पूर्ण दाबाने पाणी जात नाही. या पाणी चोरांविरूध्ददेखील आवाज उठविला पाहिजे. हे टॅब मारणारे कोण आहेत हे ग्रामपंचायतीला माहित असते. टॅबर मारून गरीबांचे पाणी चोरणाऱ्यांविरोधात मोर्चा काढण्याचे धाडसदेखील केव्हातरी ग्रामपंचायतींनी दाखविले पाहिजे. टॅब मारणाऱ्याविरोधात चकार शब्द काढायचा नाही आणि अधिकाऱ्यांना घेराव घालून त्यांचा उद्धार करणार हे योग्य नाही. त्यापेक्षा लोकांना पाणीपट्टी भरण्याची सवय लावणे. बंगलेवाल्यांनी, हॉटेलवाल्यांनी जे टॅब मारले आहेत त्यांना तो काढायला सांगणे. जेथे शक्य आहे तेथे गावाची स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविणे यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. अशा प्रकारे पाणी टंचाईची ही दुसरीही बाजू समजून घेतली पाहिजे.



## बदलते तंत्रज्ञान

### पासवर्ड विसरलात ‘हे’ जाणून घ्या!

भारतात इंटरनेटचा वापर झपाट्याने वाढत आहे. वेगवेगळ्या कामासाठी वेगवेगळी खाती असतात. जी खूप महत्त्वाची असतात. या सर्व खात्यांची नावे आणि पासवर्ड लक्षात ठेवणे देखील कठीण असते. त्याचप्रमाणे पासवर्ड विसरल्यास अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. पासवर्ड विसरल्यास तो पासवर्ड पुन्हा रिसेट करण्यात बराच वेळ वाया जातो. तर आज आम्ही तुम्हाला अशा सोप्या ट्रिक बद्दल सांगणार आहोत. ज्यामुळे तुम्हाला पासवर्ड लक्षात ठेवण्याची किंवा लिहून ठेवायची गरज नाही. तर जाणून घ्या. पुढे अशी काही माहिती देण्यात येत आहे की, ती उपयुक्त अशी आहे.





गुगलच्या या पासवर्ड फीचरचे नाव पासवर्ड व्यवस्थापक आहे. तुम्हाला हे गुगल क्रोममध्ये मिळून जाईल. यामुळे तुम्हाला पासवर्ड लक्षात ठेवण्याची किंवा लिहून ठेवायची गरज नाही. तुम्हाला फक्त गुगल खात्याचा पासवर्ड लक्षात ठेवण्याची गरज आहे. ज्यासह गुगल क्रोम सुद्धा अपडेट होईल. हे वैशिष्ट्य संगणक आणि मोबइल दोन्हीसाठी उपलब्ध आहे. त्यासाठी तुम्ही मोबईल किंवा संगणकावर क्रोम उघडा आणि वरच्या उजव्या बाजूला क्लोज ऑप्शनखाली दाखविलेल्या तीन डॉटवर जा. तीन डॉटसवर क्लिकवर केल्यावर तुम्हाला सेटिंगमध्ये जावे लागेल आणि ऑटो क्लिकवर क्लिक करावे लागेल.

यानंतर तुम्हाला पासवर्ड क्लिक करावा लागेल. येथे तुम्हाला ऑफर टू सेव्ह पासवर्डचा पर्याय दिसेल, जो तुम्हाला सक्षम करायचा आहे. आता जेव्हा तुम्ही पहिल्यांदा तुमचे खाते उघडाल तेव्हा तुमचे युजरनेम, पासवर्ड टाकताना क्रोम तुम्हाला ते सेव्ह करण्यास सांगेल. तुम्हाला सेव्हचा पर्याय निवडावा लागेल आणि तुमचे खाते, नाव, आणि पासवर्ड सेव्ह होईल. दरम्यान, संगणक किंवा मोबाइल वापरत असताना आपल्याला बऱ्याच गोष्टींची टेक्नीकलदृष्ट्या माहिती असणे गरजेचे आहे. एखाद्या गोष्टींची तुम्हाला माहिती नसेल तर केव्हाही तुम्ही करत असलेले तुमचे अतिमहत्वाचे काम थांबवू शकते. या मुळे तुमचे मोठे नुकसानही होऊ शकते. समजा आपण टाकलेला पासवर्ड विसरल्यास तो पासवर्ड पुन्हा रिसेट करण्यात बराच वेळ वाया जातो. या मुळे या गोष्टींकडे बारकाईने लक्ष देणे गरजेचे आहे.

# अमेरिकन संगणकशास्त्रज्ञ डेनिस रिची

डेनिस मॅकलिस्टेर रिची यांचा जन्म ९ सप्टेंबर १९४१मध्ये न्यूयॉर्क येथे झाला. हे एक अमेरिकन संगणकशास्त्रज्ञ होते. त्यांच्या अल्ट्रान, बी, बीसीपीएल, सी, मल्टिक्स, आणि युनिक्समधील योगदानाबद्दल त्यांना ओळखले जातात. त्यांना १९८३ मध्ये ट्युरिंग पारितोषिक आणि १९९८ मध्ये नॅशनल मेडल ऑफ टेक्नॉलॉजीने गौरविले गेले. रिची हे ल्यूसेंट टेक्नॉलॉजीकचे प्रमुख म्हणून सिस्टीम सॉफ्टवेअर संशोधन विभागामध्ये २००७पर्यंत काम करत होते. त्यांच्या एकूणच कार्याचा घेतलेला हा आढावा...



## निमित्त

डेनिस रिची यांनी भौतिकशास्त्र आणि उपयोजित गणित या विषयात हावर्ड विद्यापिठातून पदवी संपादन केल्यानंतर १९६७मध्ये, त्यांनी बेल लॅब्जच्या संगणक विज्ञान संशोधन विभागात कार्यारंभ केला. सी आज्ञावली परिभाषेचा जनक म्हणून सर्वज्ञात असलेले डेनिस रिची युनिक्स संगणक प्रणालीचे प्रमुख विकासक, आणि उची गिता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, सामान्यतः 'K/R' वा KR म्हणून उल्लेखिलेल्या (लेखक केर्निघन आणि रिची) द सी प्रोग्रॅमिंग लॅग्वेज या पुस्तकाचे सहलेखक आहेत. डेनिस रिची (उजवीकडील) केन थॉम्प्सनबरोबर रिचींचा सीचा शोध आणि त्यांचा केन थॉम्प्सनच्या जोडीने असलेला युनिक्सच्या विकासातील सहभाग, त्यांना आधुनिक संगणकशास्त्राचा प्रणेता बनवितो. सी आज्ञावली परिभाषा आजही उपयोजन आणि संगणक प्रणाली विकासात प्रामुख्याने वापरली जाते आणि तिचा प्रभाव बहुतांश आधुनिक आज्ञावली परिभाषांवर जाणवतो. युनिक्ससुद्धा प्रभावशाली असून, तिने आज प्रस्थापित झालेल्या संगणकशास्त्रातील संकल्पना आणि तत्त्वांचा पाया घातला. लोकप्रिय लिनक्स संगणक प्रणाली आणि तिची साधने रिचीच्या संशोधनाचा परिपाक आहे. विंडोज संगणक प्रणालीमध्ये युनिक्स सहत्वी साधने आणि सॉफ्टवेअर विकासकांसाठी सी संकलक समाविष्ट असतात. जरी रिची म्हणत असले की, सी परिभाषेची निर्मिती चांगले काम असल्यासारख वाटत आणि त्यांच्या जागी इतर कुणीही त्या वेळी तीच गोष्ट केली असती, तरीही बेल लॅब्जमधील त्यांचे सहकारी आणि सी प्लस प्लस चे विकासक, जार्न स्ट्रॉस्ट्रप म्हणतात त्याप्रमाणे जर डेनिसने ते दशक गूढ गणितच्या अभ्यासात घालवायचे ठरविले असते, तर युनिक्सच्या जन्माला अद्याप अवकाश असता.

युनिक्सच्या यशानंतर, रिचीने संगणक प्रणाली आणि आज्ञावली परिभाषांमधील आपले संशोधन बेल लॅब्जच्या प्लान नऊ, इन्फेर्नो संगणक प्रणाली आणि लिंबो आज्ञावली परिभाषा यातील योगदानासह सुरू ठेवले. १९८३मध्ये, रिची आणि केन थॉम्प्सन याना त्यांच्या प्रजातीय संगणक प्रणाली सिद्धान्तावरील कामासाठी आणि विषेशतः युनिक्स संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी संयुक्तरित्या ट्युरिंग पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. २७ एप्रिल १९९९ रोजी थॉम्प्सन आणि रिची यांना संयुक्तरित्या १९९८ सालच्या नॅशनल मेडल ऑफ टेक्नॉलॉजीने अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्याना हा सन्मान, त्यांचे युनिक्स संगणक प्रणाली आणि सी आज्ञावली परिभाषा यामधील उल्लेखनीय योगदान संगणक हार्डवेअर, सॉफ्टवेअर, आणि नेटवर्कींग सिस्टिम्स यांना प्रचंड प्रगतिपथावर नेणारे, संपूर्ण उद्योगाच्या वाढीस, पर्यायाने माहिती युगात अमेरिकेच्या आघाडीस हातभार लावणारे ठरले.

**–साभार विकिपिडिया**

## क्लिक...क्लिक...!

(छाया : अमेय नाझरे)



श्रीवर्धन : दिवेआगारमध्ये अधुनमधून पाऊस सुरु आहे, समुद्र किनाऱ्यावर सूर्यास्ताचे नयनरम्य दृश्यही असे दिसून येत आहे.

## आरोग्य प्रहर

### गरम पाणी पिण्याने आरोग्यावर होणारा परिणाम

निरोगी राहण्यासाठी मुबलक प्रमाणात पाणी पिणे आवश्यक असते. दररोज योग्य प्रमाणात पाणी प्यायल्याने आपण अनेक आजारांपासून लांब राहू शकतो. त्यामुळे भरपूर पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. काहीवेळा उत्तम आरोग्यासाठी थंड पाण्याऐवजी गरम पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. तर काहीजण वजन कमी व्हावे, यासाठी सतत गरम पाणी पीत असतात. सर्दी, खोकला, ताप यासारख्या व्हायरल आजारांमध्ये गरम पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. अशाप्रकारे अनेकवेळा आपण गरम पाणी पितो, पण त्याचा शरीरावर काय परिणाम होत असेल याबद्दल जास्त माहिती नसते.



तज्ज्ञांच्या मते थंड किंवा गरम पाणी पिण्याऐवजी साधे पाणी प्यावे. अपचनाचा त्रास असणाऱ्यांना सकाळी गरम पाणी पिण्याची सवय असते, तर काहीजण कायम गरम पाणीच पितात. पण जास्त गरम पाणी प्यायल्याने शरीराला नुकसानकारक ठरू शकते. यासाठी गरम पाणी प्यायल्याने शरीरावर काय परिणाम होतो ही जाणून घेणे आवश्यक आहे.गरम पाणी प्यायल्याने अपचनाची समस्या कमी होते. अपचन किंवा ॲसिडिटी जाणवत असेल तर कोमट पाणी प्यावे, यामुळे नक्की मदत होईल. वजन कमी करण्यासाठी गरम पाणी मदत करते. दिवसभरात जेवल्यानंतर कोमट पाणी प्यायल्याने जेवण लगेच पचण्यास मदत होते. त्यामुळे वजन न वाढता नियंत्रणात राहते. यासोबतच गरम पाणी प्यायल्याने जास्त भूक लागत नाही. गरम पाणी प्यायल्याने पचनक्रिया सुधारते. कोमट पाणी आतड्यांना हायड्रेट करते, त्यामुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत होते.

**किडनीसाठी ठरू शकते धोकादायक**

किडनी शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्याचे काम करते. सतत गरम पाणी प्यायल्याने डिहायड्रेशन होऊ शकते. जास्त गरम पाणी प्यायल्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडत नाहीत. रात्रीच्या वेळेस जर तुम्ही गरम पाणी पिऊन झोपला तर तुमची झोप पूर्ण होत नाही. कारण तुम्हाला सतत लघवीला लागल्यासारखे वाटते. तसेच रात्रीच्या वेळी गरम पाणी प्यायल्याने रक्तवाहिन्यांवर दबाव जाणवतो. झोप पूर्ण न झाल्यास अनेक शारीरिक, मानसिक आजरांना आमंत्रण मिळते. त्यामुळे रात्रीच्या वेळी गरम पाणी पिणे टाळावे.दरम्यान, याठिकाणी देण्यात आलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.

# द्रुतगती मार्गावर कंटेनरची कारला धडक; एक ठार





(छाया : अरूण नलावडे)

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**


मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील बोरघाटातील अफकॉन कंपनीजवळ गुरुवारी (दि. ८) दुपारी ३.४५ वाजण्याच्या सुमारास कंटेनरने इर्टिगा कारला पाठीमागून ठोकर दिली. या अपघातात एकजण जागीच ठार झाला.

द्रुतगती मार्गावरून गुरुवारी दुपारी कंटेनर पुणे ते मुंबई असा जात होता. बोरघाटातील अफकॉन कंपनीजवळ ब्रेक निकामी झाल्याने चालकाचा कंटेनरवरील ताबा सुटला व कंटेनरने समोर चाललेल्या इर्टिगा कारला पाठिमागून ठोकर दिली. त्यानंतर कंटेनर रस्त्याच्या बाजूला पलटी झाला.

या वेळी कंटेनर चालक परशुराम कुंडलिक आंधळे (वय २४, रा. लिंबोडीकर ता. आष्टी, जि. बीड) याने गाडीतून उडी मारली मात्र तो तो गाडीखाली येत जागीच ठार झाला. पुढील तपास बोरघाट पोलीस करीत आहेत.

**खोपोली बायपास ठरतोय मृत्यूचा सापळा**

गेल्या काही वर्षांपासून बोरघाटातील ढेकू गाव ते अफकॉन कंपनी खोपोली बायपास हा मार्ग मृत्यूचा सापळा ठरत आहे. या तीन किमी अंतराच्या मार्गावर मागील एक वर्षात १६ अपघात घडले आहेत. त्यात २६ जण दगावले असून ३० प्रवासी कायमस्वरूपी जायबंदी झाले आहेत. त्याचप्रमाणे ३२ वाहनांचा चुराडा झाला आहे.



(छाया : अनिस मनियार)

## हमरापूर उड्डाणपुलावर टेम्पोची ट्रेलरला धडक, १४ प्रवासी जखमी

**पेण : प्रतिनिधी**

परतीचा प्रवास करणाऱ्या गणेशभक्तांच्या टेम्पो ट्रॅव्हलर गाडीने गुरुवारी (दि. ८) पहाटे मुंबई-गोवा महामार्गावरील हमरापूर उड्डाणपुलावर ट्रेलरला धडक दिली. या अपघातात १४ प्रवासी जखमी झाले.

खेडवरून गणेशभक्तांना मुंबई सांताक्रूझकडे घेऊन जाणारा टेम्पो ट्रॅव्हलर (एमएच ४३ बीपी ७५६) या गाडीने गुरुवारी पहाटेच्या सुमारास मुंबई-गोवा महामार्गावरील हमरापूर पुलावर बंद पडलेल्या कॉईल ट्रेलर (एमएच ४६ एआर ७४)ला मागून धडक दिली. या अपघातात टेम्पो ट्रॅव्हलरमधील २२ प्रवाशांपैकी चालक सागर गुरव (वय ३१), प्रतिभा देवळे (वय ३०), रंजना भुवड (वय २५), मीनल देवळे (वय २५), काशिनाथ देवळे (वय ५०), सुरेश सखाराम नाचरे (वय ४०), प्रवीण काशिनाथ नाचरे ( वय ३४), मंगेश मधुकर देवळे (वय ४१), स्वप्निला काशिनाथ देवळे (वय ४७), संजना संजय पाटील (वय ३४), समृद्धी संजय पाटील (वय १४), दीपक गंगाराम भुवड (वय ३०), श्वेता सुनील भुवड (वय ३५), संजना सुरेश नाचरे (वय ३५) हे प्रवासी जखमी झाले. त्यांना सामाजिक कार्यकर्ते कल्पेश ठाकूर यांनी त्यांच्या रुग्णवाहिकेतून पेण उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.



## माणगाव तालुक्याला मुसळधार पावसाने झोडपले; अनेक नद्यांना पूर

**माणगाव : प्रतिनिधी**

गेले दोन दिवस मुसळधार पाऊस कोसळत असल्याने माणगाव तालुक्यात अनेक नद्यांना पूर आला असून, जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. या मुसळधार पावसामुळे वातावरणात गारवा जाणवत आहे. कोणतीही नैसर्गिक आपत्ती घडू नये, म्हणून महसूल खात्याकडून दक्षता बाळगण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत.

माणगाव तालुक्यात ७ व ८ सप्टेंबर रोजी मुसळधार पावसाने हजेरी लावली. त्यापूर्वी काही दिवस कडक ऊन पडल्याने वातावरणात उष्मा जाणवत होता. दोन दिवसांपासून सायंकाळच्या सुमारास पावसाने हजेरी लावल्यानंतर वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. गेल्या १५ दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्यामुळे पिकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव जाणवू लागला होता त्यामुळे शेतकरी धास्तावले होते. सध्या बहुतांशी शेतातील भाताचे पिक हे अर्धवट स्थितीत असून काही दिवसात ते पोटऱ्यात येणार आहे. त्यामुळे या पिकाला पावसाची आवश्यकता होती. गेल्या दोन दिवसांपासून भातपिकाला पोषक पाऊस पडत असल्याने बळीराजा सुखावला आहे, मात्र जोरदार वाऱ्यासह कोसळणाऱ्या या पावसामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

# वाडगाव येथील कुस्ती स्पर्धेत गावदेवी आंदोशी संघ विजेता

## प्रथम क्रमांकाची मानाची गदा पारनेरच्या ऋषीकेश हांडे यांने पटकावली

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे हनुमान तालिम संघ व वाडगाव ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने खुल्या कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत आंदोशी संघ विजेता ठरला, तर टाकादेवी मांडवा द्वितीय आणि जय हनुमान तालिम संघ-पनवेल तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला. स्पर्धेत प्रथम क्रमांकाची कुस्ती ऋषीकेष लांडे याने जिंकली, तर द्वितीय क्रमांकाची कुस्ती गणेश कोकरे व तृतीय क्रमांकाची कुस्ती साहिल पोगांण यांनी जिंकली.



या खुल्या कुस्ती स्पर्धेचा शुभारंभ मंगळवार (दि. ६) दुपारी चार वाजता आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते झाला. हनुमान तालिम संघाचे अध्यक्ष चंद्रकांत ठाकूर, अलिबाग तालुका कुस्तीगीर संस्थेचे अध्यक्ष जयेंद्र भगत शिवसेनेचे (शिंदे गट) राजा केणी, वाडगाव सरपंच सरिता भगत, उपसरपंच निलम थळे, मारूती हडकर, बेलोशी सरपंच कृष्णा भोपी, दीपक भुसारी, भगवान धुळे, अ‍ॅड. रत्नाकर पाटील या वेळी उपस्थित होते.

या खुल्या कुस्ती स्पर्धेत रायगड जिल्ह्यासह मुंबई, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, पनवेल, नवी मुंबई येथील नामांकीत मल्लांनी सहभाग घेतला होता. मानाची प्रथम क्रमांकाची कुस्ती पुणे हनुमान आखाड्याचा मल्ल श्रीनिवास पाथरूट व पारनेरच्या शिवछत्रपती कुस्ती संकुलाचा मल्ल ऋषीकेश लांडे यांच्यामध्ये रंगली, यामध्ये ऋषीकेश लांडे विजेता ठरला, त्याने रोख रक्कम व मानाची गदा पटकावली. व्दितीय क्रमांकाची कुस्ती लोणंद (जि. पुणे) येथील लालमाती कुस्ती केंद्राचा मल्ल गणेश कोकरे व सोलापुरच्या गोदबा कुस्ती केंद्राचा मल्ल सुरज मुलानी यांच्यामध्ये झाली. त्यामध्ये गणेश कोकरे विजयी ठरला, तर तृतीय क्रमांकाची कुस्ती हरियाणाचा साहिल पोगांण याने जिंकली. त्याने सोलापूरच्या दीपक गोफणे याला पराभूत केले. अलिबाग तालुका कुस्तीगीर संस्थेचे अध्यक्ष जयेंद्र भगत आणि हनुमान तालिम संघाचे अध्यक्ष चद्रकांत ठाकूर यांच्या हस्ते विजेत्या मल्लांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

या स्पर्धेसाठी प्रमोद भगत, आदेश पेके, अवि घासे, सुधाकर पाटील, मिलिंद भगत, प्रकाश भगत, नरेश भोपी, वैभव मुकादम, विलास पाटील यांची पंच कमिटी नियुक्त करण्यात आली होती. त्यांना नरेश कडू, प्रविण भगत, व संतोष भगत यांचे सहाय्य मिळाले. गुणलेखनाचे काम नितेश थळे यांच्यावर सोपविण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंलचान सुनिल थळे यांनी तर कुस्ती स्पर्धेचे सूत्रसंचालन पंढरपुरचे औदुंबर शिंदे यांनी केले.



हेमंत क्षीरसागर, नेरळ



नवतरुण ओमकार मित्र मंडळ, दाहिवली-कर्जत

# खालापुरातील जखमी पोलीस, होमगार्ड यांच्या मदतीसाठी दिलासा फाउंडेशनचा पुढाकार

**खालापूर : प्रतिनिधी**

एक्सप्रेस वेवरील अपघातग्रस्तांना मदत करताना जखमी झालेले खालापूर पोलीस ठाण्याचे कर्मचारी व होमगार्ड यांच्या मदतीसाठी दिलासा फाउंडेशने पुढाकार घेतला असून त्याचाच एक भाग म्हणून फाउंडेशनने गुरुवारी (दि. ८) पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्याकडे पाच हजारांचा धनादेश सुपूर्द केला.



मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर ५ सप्टेंबर रोजी रात्री कारला अपघात झाला होता. जखमी कारचालकाला मदत करण्यासाठी गेलेले पोलीस कर्मचारी राजेश्वर चव्हाण तसेच होमगार्ड लक्ष्मण आखाडे व दीपेश हातनोलकर हे गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर फोर्टिज आणि कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. खालापूर पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी आपापल्या परीने आर्थिक मदत करीत आहेत. दिलासा खालापुरातील फाउंडेशन या सेवाभावी संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत जखमी पोलीस, होमगार्ड यांच्या मदतीसाठी पाच हजारांचा धनादेश गुरुवारी खालापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक बाळा कुंभार यांच्याकडे सुपूर्द केला. या वेळी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मनोज कळमकर, उपाध्यक्षा भाग्यश्री शिंदे, अदिती कळमकर, दीपक जगताप उपस्थित होते.



**खोपोली : ब्राह्मण सभा या संस्थेतर्फे हनुमान मंदिरातील सार्वजनिक गणेशोत्सवात सहस्रावर्तने आयोजित करण्यात आली होती. या वेळी अध्यक्ष अनिल रानडे यांच्यासह नरेंद्र हर्डीकर, दीपक बाम, नंदू भट, पाठक सर, पाटणकर आदी उपस्थित होते.**

# ‘लम्पी’चा प्रादूर्भाव रोखण्याकरिता सतर्कता बाळगावी

◆ सुधागड तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. कोकरे यांचे पशुपालकांना आवाहन

**पाली : प्रतिनिधी**

गाई, म्हशीमध्ये होणाऱ्या लम्पी स्कीन या रोगाचा प्रादूर्भाव रोखण्याकरिता पशुपालकांनी काळजी घ्यावी व सतर्कता बाळगावी, असे आवाहन सुधागड तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रशांत कोकरे यांनी केले आहे. जळगाव, अहमदनगर, अकोला, पुणे व धुळे या जिल्ह्यामध्ये लम्पी स्कीन या रोगाचा प्रादूर्भाव झाल्याचे समजले आहे. या रोगाचा प्रादूर्भाव रायगड जिल्ह्यातील पशुधनामध्ये होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लम्पी स्कीन रोग हा केवळ गोवंश व महिष वर्गातील जनावरांना होणारा विषाणूजन्य त्वचारोग आहे. या आजारात पशुधन दगावण्याचे प्रमाण अत्यल्प आहे, मात्र पशुपालकांनी सतर्क राहून दक्षता घेण्याची आवश्यकता आहे.

लम्पी स्कीन रोगाचा संसर्ग कॅप्रिपॉक्स विषाणूमुळे होतो. हा विषाणू शेळ्या व मेंढ्यांमधील देवी रोगाच्या विषाणूशी संबंधित आहे. डास चावणाऱ्या माशा, गोचिड, चिलटे, बाधित जनावराचा स्पर्श, दूषित चारा-पाणी यामुळे या रोगाचा प्रसार झपाट्याने होतो. या रोगाने बाधित जनावरांच्या अंगावर १० ते २० मिलीमीटर व्यासाच्या गाठी येऊन सुरुवातीस भरपूर ताप येतो. काही जनावरात पायावर सूज येणे, लंगडणे, डोळ्यातून नाकातून चिकट स्त्राव येणे, चारा-पाणी खाणे कमी करणे अथवा बंद करणे, त्यामूळे दूध उत्पादन कमी होणे,अशी लक्षणे दिसून येतात. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न घटते.



**लम्पी स्कीन रोगाचा संसर्ग रोखण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे, तसेच सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा येथून गुरांच्या गोठ्यात कीटकनाशक फवारणीस सुरुवात करण्यात आली आहे.**

**- डॉ. प्रशांत कोकरे, पशुसंवर्धन अधिकारी, सुधागड**

बाधित जनावरे निरोगी जनावरांपासून वेगळी ठेवावीत, डास, गोचिड व तत्सम किड्यांचा बंदोबस्त करावा, तसेच, निरोगी जनावरांच्या अंगावर किडे न चावण्यासाठी औषध लावावे व गोठ्यामध्ये यासाठीच्या औषधांची फवारणी करावी, या आजाराची लक्षणे दिसून आल्यास त्या जनावरावर त्वरीत उपचार करून घ्यावेत. त्याचप्रमाणे पशुवैद्यकांच्या मार्गदर्शनानुसार लसीकरण करून घ्यावे.


## जाहीर नोटीस

आमचे अशिल बहिणाबाई कंस्ट्रक्शन, एल,एल.पी (दुधे ब्रदर्स) संचालक, १.श्री. तुकाराम उकर्डा दुधे,२. सौ. सुरेखा तुकाराम दुधे, रा. प्लॉट नं.३३, व ३४ ग.स.को.हौ.सो.लि.सेक्टर नं.२, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांनी दिलेल्या माहिती व त्यांचे सांगणेवरून सर्व लोकांस सदर जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

पनवेल महानगर पालिकेच्या हद्दीतील, पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील, फायनल प्लॉट नं.१९७, वरील पनवेल सिटी सेंटर को.ऑप.हौ.सो.लि. या नावाने ओळखली जाणारी मिळकत, ही पनवेल महानगरपालिकेने धोकादायक घोषीत केल्याने, पनवेल सिटी सेंटर को.ऑप.हौ.सो.लि.हया संस्थेचे सदस्यांनी व पदाधिकाऱ्यांनी मिळकतीचे पुनर्विकसन करावयाचे ठरविले होते. त्यानुसार दि.०१/०४/२०१५ रोजीचे अे.जी.एम.नुसार सदरहु संस्था व त्यांचे पदाधिकारी यांनी कायदेशीर टेंडर प्रक्रिया पुर्ण करून आमचे अशिलांची एकमताने विकासक म्हणून नेमणूक करण्यात आली असून, त्याबाबत नेमणुकीचे पत्र सुद्धा संस्थेने आमचे अशिलांस दिले आहे. तसेच सहायक निबंधक, सहकार संस्थां, पनवेल यांचे कडुनही, आमचे अशिलांचे नावे सदरहु मिळकतीचे पुनर्विकासनाबात आदेश देण्यांत आले आहेत. तसेच सुमारे ८० टक्के संस्थेच्या सभासदांनी आमचे अशिलांचे लाभांत सदरहु मिळकतीचे पुनर्विकासनाबात संमत्तीपत्र नोटरी करून दिलेले आहेत. त्यानंतर दि. ०३/०७/२०२२ रोजी सदरहु संस्थेच्या सभासदांची सभा घेण्यांत येवुन सर्वानुमते आमचे अशिलांना सदरहु संस्थेच्या मिळकतीचा पुनर्विकसनाचे काम सुरू करणेकामी, सुरू करणेकामी, पुनर्विकसन करारनामा व अखत्यारपत्र नोंदणी करून देण्याचा ठराव करण्यांत आलेला असून, तसे पत्र संस्थेने आमचे अशिलांना दिलेले आहे. सदरहु संस्थेचे कागदपत्राचीपुर्तता करणे करीता, उदा. पुन्हा स्ट्रक्चर ऑडीट करणे व मिळकतीचे प्रापर्टीकार्डावर हिस्सा फोड करणेकरीता लागणाऱ्या खर्चापोटी, मोठी रक्कम आमचे अशिलांकडुन मागण्याचा ठराव मंजुर करण्यांत आला असून त्याबाबतचे पत्रही संस्थेकडून आमचे अशिलांस देण्यांत आलेले आहे. आमचे अशिलांस सदरहु मिळकतीचे पुनर्विकास करण्यांस स्वारस्य असल्यानेच, संस्थेचे लेखी मागणीनुसार आमचे अशिलांनी मोठी रक्कम संस्थेस मोबदल्यापाटी अदा केलेली आहे. सदरहु संस्थां व त्यांचे पदाधिकारी यांनी दि. १४/०७/२०२२ रोजी पुनर्विकसनाचा करारनामा, त्यातील नमुद अटी व शर्तीसह आमचे अशिलांचे लाभात साक्षांकीत केला असून तो नोटरी करून देण्यांत आलेला आहे. सदरहु मिळकतीचे पुनर्विकास करणेचे कामी संस्थेच्या इमारतीतील काही सदनिका धारकांनी व गाळे धारकांनी, आमचे अशिलांकडून भाड्याची रक्कम व डिपॉझिटची रक्कम स्विकारून, त्यांचे ताब्यातील सदनिका व वाणीज्य गाळे स्वखुशीने खाली करून आमचे अशिलांचे ताब्यात दिले आहे.

तरी तमाम लोकांस सदर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरहु मिळकतीचे पुनर्विकसनाबाबत, पनवेल सिटी सेंटर को. ऑप. हौ.सो. लि. व त्यांचे पदाधिकारी यांचे सोबत कोणत्याही प्रकाराचा व्यवहार करू नये अगर त्यासंबंधी कोणत्याही व कसल्याही प्रकरचा पुनर्विकसन करार, लेख, दस्तऐवज करू नये. सदरहु नोटीसीउप्परही पनवेल सिटी सेंटर को. ऑ.हौ. सो. लि. यांचे पदाधिकाऱ्यांसोबत, परस्पर कोणताही करार, पुनर्विकसन करार, लेख, दस्तऐवज, केल्यास, तो बेकायदेशीर ठरणार असून तो आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही यांची नोंद घ्यावी.

कळावे.

दिनांक : ८/०९/२०२२

**सही/-**
**अ‍ॅड. राजेश महेर**

शॉप नं. ७ व ९, दत्तप्रसाद को. हौ. सोसायटी लि. बँक ऑफ इंडिया समोर, शिवाजी रोड, पनवेल,ता. पनवेल, जि. रायगड. पिन ४१०२०६



## ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे

ता. पनवेल, जि. रायगड

## जाहिरात क्र. - १

ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे ता. पनवेल करिता १ प्लंबर तातडीने भरणे आहे. त्याच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे:-

१) प्लंबिंग कामाचा दाखला
२) स्थानिक उमेदवार न सापडल्यास बाहेरील उमेदवार निवडणेत येईल.
३) सदरचे कामाकरिता आठवडयातील ५ दिवस मासिक २० दिवसाचा मेहनताना १००००/प्रमाणे राहील.
४) चांगले काम करीत असल्याचे निदर्शनास आल्यास ११ महिन्यानंतर कायम करण्याचा विचार ग्रा.पं करील.
५) वय वर्ष मर्यादा १८ ते ३५ राहील. मागासवर्गीयासाठी ५ वर्ष शिथिलता राहील.
६) स्वत:चे दुचाकी वाहन असल्यास उत्तम
७) पंचायतीने सांगितलेली पाणीपुरवठा विषयक सर्व प्रकारची कामे करणे आवश्यक राहील.
८) पाणीपुरवठा दुरुस्ती काम नसेल तेव्हा पंचायतीने सांगितलेले इतर तसमान काम करणे आवश्यक राहील.
९) कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते ५ पर्यंत अर्ज दिनाक. २३/०९/२०२२ पर्यंत सादर करावेत
१०) उमेदवाराची निवड करणेचा अंतिम अधिकार सरपंच /ग्रा. वि. अ गुळसुंदे यांचा राहील.

सभा दि. २६/८/ २०२२/४८/ अन्वये

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी,**
**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**

**सही/-**
**सरपंच,**
**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, **मौजे-आंबे तर्फे तळोजे, ता. पनवेल, जिल्हा - रायगड** येथील जमीन मालक **नलिनी हरिश्चंद्र सुर्वे** यांचे नावे, ताबेकब्जात, व वहीवाटीतील, मालकी हक्कात खालील वर्णन केलेली मिळकत आहेत. वरील जमीन यांचे नावे खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकतीमधील हिस्सा/क्षेत्र आमचे अशिल **श्री. पृथ्वी प्रल्हाद देशमुख** यांनी कायम फरोक्त विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे आंबे तर्फे तळोजे, ता. पनवेल, जि. रायगड**

| स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| २५ | १ | ०-१६-२०<br>पो.ख.०-०१-५०<br>०-१७-७० | १.०१ |

सदर वर्णन केलेली मिळकती संदर्भात कोणीही व्यक्तीच्या सदर जमिन मिळकतीमध्ये किंवा जमिन मिळकतीच्या भागात विरूध्द कब्जाने किंवा वारसाने, गहाण,दान, विक्र, देणगी, लिज, चार्ज, ट्रस्ट, लायन्सन, पोटगी, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, वचनचिठ्ठी किंवा कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास, त्यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिकारीक इसमा तर्फे खालील सही करणार वकीलांकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपण आपले जवळ असलेल्या पुराव्याचे कागदपत्रांसहीत खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल करव्यात.

वरील मुदतीत हरकती दाखल न झाल्यास, एखादा हक्क असल्यास, तो रद्दबाबत झाला आहे. किंवा असल्यास जाणीवपुर्वक सोडून दिला आहे. व सदरच्या जमिन मिळकतीमध्ये कोणतीमध्ये कोणत्याही प्रकाराचे हक्क व हितसबंध नाही असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीसबंधी नियोजित कसलीही तक्रार चालणार नाही, व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिल जबाबर राहणार नाहीत., याची नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल.**
**दिनांक :- ०८/०९/२०२२**

**सही/-**
**अ‍ॅड. कैलास नारायण घरत**
जी.एस.घरत निवास, प्लॉट नं.१९६, सेक्टर नं.१, ए. एस. सी कॉलेज जवळ, पुष्पक/वडघर, (नविन वरचे ओवळे) ता. पनवेल, जि.रायगड ४१०२०६.
मो. ९५९४६५३७७७



पनवेल : गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत यांच्या घरातील विराजमान गणरायाचे न्हावे ग्रामपंचायतीचे सदस्य सागर ठाकूर यांनी दर्शन घेतले.



भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र पाटील, पागोटे, उरण



एकता मित्र मंडळ, करंजाडे, पनवेल



गणेश तांडेल, उरण चारफाटा



धीरज बुंदे, उरण



दौलत भोईर, आवरे, उरण



पनवेल तालुका पोलीस ठाणे



निसर्गा रोशन डाकी, विंधणे, उरण



अभिजित घरत, बेलपाडा, उरण



वहाळ माजी सरपंच तैमूर पाटील, मोरावे



माजी नगरसेवक राजेश कोळी, मोरा, उरण



गजानन ठाकूर, भेंडखळ, उरण



दिलीप सदानंद घरत, रांजणपाडा, उरण



राजेश पाटील, उरण



एकनाथ घरत, चिंचवन, पनवेल



श्याम कोळी, मोरा, उरण




कर्जतच्या राजश्री खैरनार यांचा नगर येथील गणपती बाप्पा.



चेतन चंद्रकांत जाधव, कळंबोली गाव, पनवेल



कोमसापचे ज्येष्ठ सदस्य सुरेंद्र पोतदार, आदर्शनगर, वरळी



अनिकेत अनिल गुडे, पनवेल



अनंत गणपत ठाकूर, दिघोडे, उरण

# जिल्ह्यातील २० ग्रामपंचायतींमध्ये १३ ऑक्टोबरला निवडणूक

अलिबाग : प्रतिनिधी

राज्यातील एक हजार १६६ ग्रामपंचायतींच्या सदस्यपदांसह थेट सरपंचपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १३ ऑक्टोबर २०२२ रोजी मतदान होणार आहे. त्यात रायगड जिल्ह्यातील २० ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील वेश्वी, नवेदर नवगाव, कोप्रोली, कर्जत तालुक्यातील पोटल, पालीतर्फे कोतवाल खलाटी, खालापूर तालुक्यातील चौक, आसरे, लोधीवली, तूपगाव, पनवेल तालुक्यातील खेरणे, पेण तालुक्यातील कोपर, पोलादपूर तालुक्यातील तुर्भे खोडा, तुर्भे खुर्द, तुर्भे बुद्रुक, वझरवाडी, महाड तालुक्यातील खरवली, माणगाव तालुक्यातील देगाव, पन्हळघर बुद्रुक, पन्हळघर खुर्द तसेच श्रीवर्धन तालुक्यातील आदगाव या ग्रामपंचायतीसाठी १३ ऑक्टोबरला मतदान होईल.

संबंधित तहसीलदार १३ सप्टेंबर रोजी निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करतील. नामनिर्देशनपत्र २१ ते २७ सप्टेंबर या कालावधीत दाखल करण्यात येतील. शनिवार व रविवारच्या सुट्टीमुळे २४ व २५ सप्टेंबर रोजी नामनिर्देशनपत्र दाखल करता येणार नाहीत. अर्जांची छाननी २८ सप्टेंबरला होईल. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबर (दुपारी ३ वाजेपर्यंत) आहे. त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचे वाटप होईल. मतदान १३ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल. मतमोजणी १४ ऑक्टोबर २०२२ रोजी होईल.




**मतदान होणाऱ्या ग्रामपंचायती**

**अलिबाग :** वेश्वी, नवेदर नवगाव, कोप्रोली,
**कर्जत :** पोटल, पालीतर्फे कोतवाल खलाटी,
**खालापूर :** चौक, आसरे, लोधीवली, तूपगाव,
**पनवेल :** खेरणे, **पेण :** कोपर, **महाड :** खरवली,
**पोलादपूर :** तुर्भे खोडा, तुर्भे खुर्द, तुर्भे बुद्रुक, वझरवाडी,
**माणगाव :** देगाव, पन्हळघर बुद्रुक, पन्हळघर खुर्द
**श्रीवर्धन :** आदगाव

प्रधानमंत्री आदि आदर्श ग्रामविकास योजना...

# रायगड जिल्ह्यातील ८८ गावांची निवड

अलिबाग : प्रतिनिधी

अनूसुचित जमातीच्या लोकसंख्या असलेल्या गावांचा एकात्मिक, आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी केंद्र सरकारने प्रधानमंत्री आदि आदर्श ग्रामविकास ही योजना प्रस्तावित केली आहे. राज्यातील ज्या गावांमध्ये किमान ५०० व ५० टक्के इतकी आदिवासी समाजाची लोकसंख्या आहे, अशा महाराष्ट्रातील एकूण तीन हजार ६०५ गावांची निवड केंद्र शासनाने या योजनेकरिता केली असून, त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील ८८ गावांचा समावेश असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

योजनेच्या पाच वर्षांच्या कालावधीत निवडलेली सर्व तीन हजार ६०५ गावे अंमलबजावणीमध्ये अंतर्भूत करण्यात येतील. जिल्ह्यातील पेण, अलिबाग, मुरूड, रोहा सुधागड, श्रीवर्धन, उरण, पनवेल, कर्जत, म्हसळा, महाड व खालापूर या १२ तालुक्यातील ८८ गावांची सदर योजनेकरीता निवड करण्यात आली आहे. ही योजना राबविताना गावकऱ्यांच्या सक्रीय सहभागातून आणि ग्रामसभेच्या, पंचायतीच्या मान्यतेने ग्रामविकास आराखडा तयार करण्यात यावा, ग्रामविकास आराखडा तयार करताना गावांतर्गत व गावांना जोडणारे रस्ते, दूरसंचार सुविधा, अंगणवाडी केंद्रे, आरोग्य उपकेंद्रे पिण्याच्या पाण्याची सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा, गटारे व मल व्यवस्थापन यासोबतच कौशल्य विकास वृद्धी कार्यक्रम, समुदाय वन विकास, वनधन कार्यक्रम, जलस्त्रोतांचे संरक्षण यांचा समावेश करावा, असे सूचित करण्यात आले आहे.

या योजनेचा केंद्र, राज्य शासनाच्या इतर योजनांसोबत निधी योजना, वित्त आयोग, सामुहिक वन हक्कांतर्गत करावयाचे नियोजन, ठक्कर बाप्पा वस्तीसुधार योजना, जिल्हा नियोजनांतर्गत प्राप्त होणारा निधी, जिल्हा खनिज निधी किंवा इतर योजना, एकात्मिकरण करण्यासाठी गटविकास अधिकारी हे नियोजन करतील. कोणती कामे कोणत्या योजनेच्या निधीतून घेण्यात येणार आहेत याबाबतची स्पष्टता ग्रामविकास आराखड्यात असावी. तसेच कामांची द्विरुक्ती होणार नाही, याची दक्षता घेण्यात येणार आहे.

**योजनेची उद्दिष्टे**

निवडलेल्या गावांचा अभिसरणाच्या माध्यमातून एकात्मिक सामाजिक व आर्थिक विकास साधणे.

गावांच्या गरजा, क्षमता आणि आकांक्षा लक्षात घेऊन ग्रामविकास आराखडा तयार करणे.

केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत वैयक्तिक/ कौटुंबिक लाभार्थ्यांचा अधिकाधिक समावेश करणे.

आरोग्य, शिक्षण, दळणवळण व उपजीविका यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे.

## रोह्यातील डॉ. देशमुख महाविद्यालयाला राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यापीठ स्तरीय सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार

रोहे : प्रतिनिधी

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या रोहे येथील डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालयाला मुंबई विद्यापीठ स्तरीय राष्ट्रीय सेवा योजना सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

शिक्षक दिनानिमित्त मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पस येथील फिरोजशहा मेहता भवनात झालेल्या कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांच्या हस्ते डॉ. देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांनी नुकताच हा सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार स्वीकारला. या वेळी प्रभारी कुलगुरू डॉ. रवींद्र कुळकर्णी, प्रभारी कुलसचिव शैलेंद्र देवळाणकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.


(छाया : महादेव सरसंबे)

डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महविद्यालयाने नियमित व निवासी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून केलेली कामगिरी व विद्यापीठ व राज्यस्तरावरील केलेले शिबिरांचे आयोजन या कामगिरीची दखल घेऊन मुंबई विद्यापीठाने या महाविद्यालयाची सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कारासाठी निवड केली.

सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार मिळाल्याबद्दल रोहा पंचक्रोशीत डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महविद्यालयाचे कौतुक होत आहे.

## वाफेघर–ठाणे–बोरिवली गाडीला प्रवाशांचा प्रतिसाद

पाली : रामप्रहर वृत्त

गणेशोत्सवा निमित्ताने एसटी महामंडळाने सुधागड तालुक्यातील वाफेघर ते ठाणे–बोरीवली ही बससेवा केली. या सेवेला चाकरमान्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बुधवारी (दि. ७) सकाळी १० वाजता ही बस वाफेघर येथून बोरीवली (सुकुरवाडी) कडे रवाना झाली. यामुळे गणेशोत्सवासाठी गावी आलेल्या चाकरमान्यांचा परतीचा प्रवास सुखकर झाला.

या साठी एसटी प्रवासी संघटनेचे अध्यक्ष सुरेश मराठे, कार्याध्यक्ष शांताराम जुवळे, जय चव्हाण, एसटी महामंडळाच्या रायगड विभाग नियंत्रक अनघा बारटक्के खवली ग्रामपंचायत सरपंच रुचिता बेलोसे आदींचे सहकार्य लाभले.

## सुधागडातील अमिषा बामणेची जिल्ह्याच्या अंडर १९ क्रिकेट संघात निवड

पाली : रामप्रहर वृत्त

सुधागड तालुक्यातील आपटवणे गावातील अमिषा बामणे हिची रायगड जिल्हा अंडर १९ क्रिकेट संघात निवड झाली आहे. या यशाबद्दल तिचा तहसीलदार दिलीप रायण्णावर यांच्या हस्ते मंगळवारी (दि. ६) सन्मान करण्यात आला.

अमिषा पालीतील ग. बा. वडेर हायस्कुल व व. ग. ओसवाल कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इयत्ता ११ वीत शिकत आहे. जिल्ह्याच्या क्रिकेट संघामध्ये निवड झालेली अमिषा ही तालुक्यातील एकमेव मुलगी आहे.

## नेरळचे सोपान खाडे यांचा मुंबईच्या राजाच्या दरबारात सन्मान

कर्जत : बातमीदार

मध्य रेल्वेचे मोटारमन राजाराम खडे यांना माथेरानच्या डोंगरातील दगडात गणपती दिसला आणि त्या ५४ फुटाच्या दगडात निसर्गराजा गणपती साकारला. त्या निसर्ग राजा गणपतीची रंगसंगती आणि ठेवण साकारणारे गणेश मूर्तिकार सोपान खाडे यांचा 'मुंबईचा राजा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिंतामणी गणेशोत्सव मंडळाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

माथेरानच्या डोंगरात निसर्गराजा कड्यावरचा गणपती असून, राजाराम खडे यांनी १४ वर्षे मेहनत घेऊन दगडात गणेशमूर्ती साकारण्याचे काम केले, तर त्या मूर्तीमध्ये जिवंतपणा आणण्यासाठी सोपान खाडे यांनी रंगसंगती व आखणीचे काम केले. गणेशोत्सवात मुंबईचा राजा अर्थात लालबाग येथील चिंतामणी मंडळाच्या बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी सोपान खाडे पोहचले होते. तेथे चिंतामणी मंडळाच्या कार्यकर्त्यांना सोपान खाडे यांचा सत्कार केला.



## म्हसळ्यात विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची हजेरी

म्हसळा : प्रतिनिधी

म्हसळा शहरासह संपूर्ण तालुक्यातील विविध भागांत बुधवारी (दि. ७) संध्याकाळी ढगफुटीसदृष्य पाऊस पडला. दुपारी आकाशांत ढगांची जमवाजमव झाली, त्यानंतर जोरदार वारा, विजांचा कडकडाट व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पावसाने दमदार हजेरी लावली. आभाळ फाटल्याप्रमाणे पाऊस कोसळत होता. या वेळी महावितरणची बत्ती गुल झाल्याने बहुतांश भागात अंधाराचे सावट पसरले होते. अचानक आलेल्या या पावसाने सर्वांचीच त्रेधातिरपीट उडवली.



म्हसळा तालुक्यात बुधवारी संध्याकाळी काही तासाच्या अवधीत ८५ मिमी. पाऊस पडला. शहरांतील सखल भागात व सदोष गटारे असलेल्या दिघी रोड, एसटी स्टँड, भाजी मार्केट, नगरपंचायत कार्यालयासमोरील गल्लींत आणि परिसरांत पावसाचे पाणी साठले होते.

म्हसळा तालुक्यात अद्यापही सरासरी पर्जन्यमान पुर्ण होण्यासाठी किमान १००० ते १२०० मिमी पावसासाची कमतरता आहे, मात्र बुधवारी झालेला हा पाऊस भातपिकाला पोषक आहे, हळवी भातपिके अद्याप निसवली नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

मागील सहा वर्षाच्या नोंदी पाहता म्हसळा तालुक्यात सप्टेंबर अखेर ते ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत पाऊस पडला आहे. बुधवारी जोरदार पाऊस झाला असला तरी तालुक्यात नैसर्गिक आपत्तीखाली कोणत्याही घटनेची नोंद झाली नसल्याचे निवासी नायब तहसीलदार जे. एम. तेलंगे यानी सांगितले.

## जनकल्याणच्या सहकार्याने पोलादपुरमध्ये रक्तदान शिबिर

पोलादपूर : प्रतिनिधी

एक गाव एक गणपती ही संकल्पना राबविणाऱ्या पोलादपूर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे महाड येथील जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित केले होते. ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांनी या शिबिराचा शुभारंभ केला.



पोलादपूर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे शहरातील स्व. बाळासाहेब ठाकरे सभागृहामध्ये पोलादपूरचा राजाची स्थापना करण्यात आली असून त्या निमित्ताने मंडळाने विविध सांस्कृतिक, आरोग्यविषयक तसेच करमणुकीच्या उपक्रमांचे आयोजन केले होते. या उपक्रमांना भाविकांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, असे अध्यक्ष दर्पण दरेकर यांनी सांगितले.


रक्तदान शिबिराला सामाजिक कार्यकर्ते राजन ब. पाटणकर, ५२ वेळा रक्तदान करणारे सुदेश शेठ, ओंकार मोहिरे, प्रतिक सुर्वे, डॉ. पल्लवी साळुंखे यांच्यासह जनकल्याण रक्तपेढीचे कर्मचारी, मंडळाचे पदाधिकारी आणि रक्तदाते उपस्थित होते.

# लहरी हवामानाला लागू पडली पेर भाताची मात्रा

## कर्जतच्या हरिश्चंद्र ठोंबरे यांचा प्रयोग यशस्वी

कर्जत : प्रतिनिधी

यंदा कर्जत तालुक्यात भातपिकाच्या पेरण्या वेळेवर झाल्या होत्या, मात्र त्यानंतर पावसाने दडी मारल्याने भात रोपे हवी तशी तयार झाली नाहीत. तरीही खचून न जाता तालुक्यातील एका प्रगतशील शेतकऱ्याने पेर पद्धतीने बियाण्याची पेरणी करून भातपिक घेण्याचा निर्णय घेतला आणि तो कमालीचा यशस्वी झाला. यामुळे मुख्य म्हणजे मजुरांची भेडसावणारी समस्या सुटली आणि वेळ व मेहनतसुद्धा वाचली.


(छाया : विजय मांडे)

यंदा वेळेवर आणि चांगला पाऊस होणार या अंदाजाने कर्जत तालुक्यातील शेकऱ्यांनी उत्साहात पेरण्या केल्या, मात्र त्यानंतर पावसाने मारलेल्या दडीमुळे शेतकऱ्यांवर पुन्हा पेरण्या करण्याची वेळ आली, परंतु वेळ निघून गेली होती. यावर तालुक्यातील कोषाणे गावातील प्रगतशील शेतकरी हरिश्चंद्र तातू ठोंबरे यांनी पेर पद्धतीने भात बियाणे पेरण्याचा निर्णय घेतला. आपला मुलगा भरत व अन्य एका माणसाला सोबत घेऊन त्यांनी चार एकर जमिनीत केवळ दोन तासात पेर पद्धतीने भात बियाणे पेरले. सहा– सात दिवसांतच भात रोपे बाहेर आली आणि आता ती शेते हिरवीगार जोमाने डौलत आहेत.

जमिनीला थोडा ओलावा आल्यानंतर ठोंबरे यांनी पूर्ण शेतात साधी नांगरणी केली. गवत उगवू नये म्हणून भात बियाण्यांत साथी नावाची तणनाशक पावडर मिसळली. त्यांनतर बियाणे पेरले व पुन्हा हलकी नांगरणी केली. त्यामुळे बियाणे मातीत मिसळले गेले. भात रोपांमध्ये थोडे अनावश्यक गवत उगवले. त्यावर त्यांनी युरियामध्येसुद्धा साथी तणनाशक पावडर मिसळून खत मारले. त्यामुळे भातपिक हिरवेगार झाले व अनावश्यक गवत नष्ट झाले. कसई नावाचे गवत आल्यास क्लिंचर नावाचे तणनाशक मारावे, असे त्यांचे अनुभवाचे बोल आहेत. या प्रयोगाने त्यांची शेती दृष्ट लागण्यासारखी झाली आहे.

**"गेल्या वर्षी पावसामुळे वाहून गेलेल्या भात रोपानंतरही मी पेर पद्धतीचा प्रयोग केला होता, मात्र त्यावेळी भात भिजवून मोड आलेले बियाणे पेरले होते. त्यामध्ये फॉरेट पावडर मिसळल्यामुळे पक्षी, पाखरे किंवा खेकडेसुद्धा फिरकले नाहीत. त्यामुळे पीक सुरक्षित राहिले होते. यंदा पेर पद्धतीने भात बियाण्याची पेरणी केली. हा प्रयोग कमालीचा यशस्वी ठरला आहे.**
**– हरिश्चंद्र ठोंबरे,**
**प्रगतशील शेतकरी,**
**कोषाण, ता. कर्जत**

## माणगावातील शिबिरात १६ जणांची नेत्रतपासणी

माणगाव : प्रतिनिधी

नवीन पनवेल येथील शंकरा आय हॉस्पिटलच्या सहकार्याने प्रसिद्ध उद्योजक विजय मेथा–भातवाले यांनी बुधवारी (दि. ७) माणगाव एसटी स्थानकाजवळील वृत्तपत्र विक्रेते पितांबर मेथा यांच्या हॉलमध्ये नेत्र तपासणी शिबिर आयोजित केले होते. ९६ जणांनी या शिबिराचा लाभ घेतला.

शंकरा आय हॉस्पिटलचे डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी शिबिरार्थिंची नेत्र तपासणी केली. त्यात मोतीबिंदू आढळलेल्या १९ रुग्णांना बुधवारी नवीन पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर शस्त्रक्रिया आल्या.

आयोजकांतर्फे ही सर्व सेवा विनामूल्य देण्यात आली. विजय मेथा यांच्या सहकार्याने गेल्या चार महिन्यांपासून आम्ही माणगावात नेत्र तपासणी शिबिर घेत आहोत. आतापर्यंत २५०हून अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या असल्याची माहिती डॉ. प्रकाश पाटील यांनी या वेळी दिली.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी विजय मेथा, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा, सुप्रिया शिंदे यांच्यासह निकिता महापुस्कर, अक्षता पार्टे, प्रिया अग्निहोत्री, भारती टांगले, शिल्पेश साटम, नरेश अलवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अलिबागमध्ये राजे उमाजी नाईक यांना अभिवादन



अलिबाग : जिमाका

राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी (दि. ७) जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेला उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) सर्जेराव मस्के–पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी तहसीलदार विशाल दौंडकर यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.









पनवेल : भाजपचे तालुकाध्यक्ष अरूणशेठ भगत यांनी विविध ठिकाणी विराजमान झालेल्या गणरायाचे दर्शन घेतले. चिंचवण येथे रमेश पाटील, कोप्रोली येथे माजी सरपंच राम पाटील, आपटे येथे तालुका उपाध्यक्ष संजय टेंभे, सावळे येथे माजी सरपंच अविनाश गायकवाड, सोमटणे येथे चंद्रकांत बैकर, सुशिल बैकर, चेतन पोपेटा, खांदा कॉलनी येथे खांदेश्वरचा महागणपती, नवीन पनवेल येथे विघ्नहर्ता गणरायाचे तसेच मिरची गल्ली येथील मिरचीगल्लीचा राज्याचे दर्शन घेतले. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय, राजिप सदस्य अमित जाधव, खांदा कॉलनी युवा मोर्चा अध्यक्ष अभिषेक भोपी आदी उपस्थित होते.





स्वरांश घरत, खारपाडा, पेण




पनवेलच्या रहिवासी अस्मिता सावंत यांचा सिंधुदुर्ग येथील गणेश.



पनवेल : भाजपच्या महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, लिना पाटील यांनी चंद्रकांत बैकर यांच्या निवासस्थानी गणपतीचे दर्शन घेतले. या वेळी शुभांगी बैकर, शितल बैकर, रुपाली तोंडे, चेतन पोपेटा, चंद्रकांत बैकर उपस्थित होते.

## निडी येथे गौरोबा उत्सव उत्साहात




**नागोठणे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील निडी येथे जुनी असलेली परंपरा गौरोबा उत्सवाची आजही जोपसण्यात येत आहे. ही मूर्ती पेंढ्यापासून तयार करण्यात येते. गौरा म्हणजे शिवशंकरस्वरुप देवता मानली जाते.

गौरोबा उत्सवानिमित्त पारंपरिक नाच शक्ती-तुराचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी ढोल-ताशांच्या गजरात गावामध्ये मिरवणूक काढण्यात आली.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com